
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र.




REFBK-0012716
REFBK-0012716

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 33209 वि: ...
क्रमांक ... नों दि: ...

क म ण्ड लु

प्रकाशक : **अ. अं. कुलकर्णी**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळकरोड, पुणें २
मुद्रक : **वि. नी. पटवर्धन**, साधना प्रेस, ४३०-३१ शनिवार पेठ, पुणें २.

REFBK-0012716

रविकिरण मंडळाचें अठ्ठेचाळिसावें पुस्तक

# कमण्डलु

कविता संग्रह

यशवन्त

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणें

© यशवन्त दिनकर पेण्ढरकर
प्रकाशन दिन : १ मे १९६२
मुखपृष्ठ : दलाल आर्ट स्टुडिओ
किंमत : साडेतीन रुपये

प्रिय सुहृद्

श्रीयुत यशवन्तराव चव्हाण

यांसी

ह्या कमण्डलूमधिं भरलें आहे पाणी
जें वाहत आहे कुबडीतीर्थामधुनी
तो कमण्डलू हा देतों अपुल्या हातीं

१ मे १९६२

यशवन्त

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | फुलतों आम्ही | ९ |
| २ | परिस्थितीपुढें | १२ |
| ३ | ताम्हनाचे निनाद | १४ |
| ४ | चुंबुनि अंगार सुखें | १६ |
| ५ | सेवेस उभा मी | १८ |
| ६ | पूर्वजन्मिचें पुण्य | २० |
| ७ | जाणें पुढतीं पुढतीं | २२ |
| ८ | पूजा | २४ |
| ९ | त्या दिवसापासुनी | २६ |
| १० | घडाव्या आपुल्या भेटी | २९ |
| ११ | पंच पंच उष:काल | ३१ |
| १२ | जगलेंच पाहिजे मला | ३३ |
| १३ | गीत माझें, रूप तुझें | ३५ |
| १४ | पांढऱ्या ढगांनो | ३७ |
| १५ | महात्मन् ! करितों जयजयकारा- | ३९ |

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १६ | पाथेय | ४१ |
| १७ | नाटक झालें जन्माचें तें | ४३ |
| १८ | नाहीं म्हणूं कशाला ? | ४६ |
| १९ | वाट | ४८ |
| २० | वेगाचीं विलसितें | ५१ |
| २१ | सल | ५३ |
| २२ | शीर कपाळावरली | ५६ |
| २३ | होतां तुझी आठवण | ५८ |
| २४ | मी कोण काय देणा | ६१ |
| २५ | गुटमळतें मन | ६३ |
| २६ | स्वप्न पाहिलेंस मना | ६४ |
| २७ | मेज इथें हें | ६५ |
| २८ | ही माझी कविता जुनी | ६८ |
| २९ | मंत्राक्षता | ७० |
| ३० | उंच चढा ! उंच चढा ! | ७३ |

अनुक्रम ...32289... वि: ...3104...
क्रमांक ...... नों: दि: 28/5/62
9698

१

# फुलतों आम्ही

फुलतों आम्ही
फुलावें म्हणून फुलतों आम्ही
ऋतु नसे की
यावें या जगतीं कुणाच्या कामीं
— बांधोत कोणी
देवपूजा लाख फुलें वाहूनी
भूषवो कोणी
कलेवर, शूर, कान्त, कामिनी.
आम्हां फुलांना
सुख ना दुःख ना पाप ना पुण्य
आम्ही फुलतों
फुलण्यांत होतों केवळ धन्य.

◎ ◎ ◎

वाहते नदी
मोहवी तियेला काय अंबुधी ?
ती तर म्हणे
" एकच जाणतें नित्य वाहणें.
— मळया शेतें
पिकतीं, परि तें ध्येय नव्हतें.
नौकाविहारा
नाहीं ह्या डोहाच्या घेत आकारा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 9256
शाखा

मत्स्य नांदती
नांदोत कासवें मगरी किती,
माझिया चित्तीं
राग ना लोभ ना तेविं ना क्षिती
अपेक्षिलें ना
येतील ओहळ नद्या संगतीं
एकच ठावें
वाहत वाहत जाणें पुढती. ''

◎ ◎ ◎

सरसरती
मेघांतून धारा धरेवरती
परन्तु " धरा—
लक्ष्य न आमुचें '' मेघ म्हणती,
" कधीं तुषार
कधीं कधीं होतों थेंब टपोर
आम्हां देखून
नाचती, नाचोत प्रमत्त मोर
' ये रे पावसा '
रंगण धरून नाचती मुलें
तेवढ्यामुळें
म्हणा न केले हे खजीने खुले.
चंद्राभोंवतीं
नव्हतें योजिलें करावें खळें
इंद्रधनुष्य
नव्हतें चिंतिलें निर्मावें भलें
आमुचे थेंब
पडतां पडतां होतात गारा

मौक्तिक हिरे
लाभती धरेला जणु शृंगारा
असलें कांहीं
शिवलें नव्हतें आमुच्या मना
आम्ही नेणतों
तृषार्त चातकां, तान्हेल्या जनां
एकच ठावें
बरसत यावज्जीवन जावें"

फुलतों आम्ही
फुलावें म्हणून फुलतों आम्ही.

९-७-६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ....३२२०७.... दि: ....८/१/८४....
क्रमांक ....१५६५५.... नों: दि: ....१८/५/८२....

२

## परिस्थितीपुढें —

अगा माझ्या मना
नको बनूं भ्याड, नको होऊं मूढ
परिस्थितीवर जरी घेणें सूड.

पालटेल कधीं का ती आपसूक ?
वांछिसी कृपेची तिच्या काय भीक ?
भिकेंत तुजला संतोष कोणता ?
वरील केवि ती भिकारकरंटा ?

अथवा काय ती मंगल देवता–
व्हावी जी प्रसन्न तिला आळवितां ?

पिसाट जंगली मूर्त ती क्रूरता
येई आसूडानें तिला वळवितां.
कडाड-कडाड फूटतां आसूड
कोठवर किती राहील ती हूड ?

तुझिया डोळ्याच्या पात्याचेंही भय –
घेऊन, करील तुझा अनुनय.

मग तिच्या स्कंधीं मान टाकूनिया
विसावतां तुलां येईल लीलया
गळाही खुशाल देई जबड्यांत
नच खुपतील करालही दांत.

रुसून कधीं राहील अडून
पाहील जरा पंजा उगारून
माजवील केव्हां आरडाओरडा
परंतु प्रभावी ठरेल कोरडा.

अगा माझ्या मना, हेंही मात्र सत्य—
जीवित तिच्याशीं संग्रामचि नित्य.
गाफील जरासा जरी राहिलास
क्षणार्धांत तुझा करील ती घास.

परि झुंजाराचें होय तें मरण
त्याच मरणाचें अनन्य भूषण.
शरणागती परिस्थितीपुढें—
म्हणजे राहणें जिवंत मढें.

८-८-५१

३

# ताम्हनाचे निनाद

कुळांकुळांतुनि घरांघरांतुनि जन्मतात बालकें
ताम्हनें वाजतात कौतुकें
कुसवाच्या पलिकडे गजर ते लगेच होती मुके

परंतु शतकापूर्वी एका पन्तोजीच्या कुळीं
ताम्हनावरी झडे जी पळी
तीच चौघड्यावरली ठरली टिपरी भूमंडळीं

गजर वाढतां वाढत गेला पुढतीं दाही दिशां
उतरली सत्तान्धांची नशा
अभ्युदयाचा येइ भरवसा पराभूत मानसा

झोप उडाली निजलेल्यांची, भ्रान्तां दृष्टी मिळे
लागले चालाया पांगळे
जडमूढांमधिं चैतन्याचे दीपकळे झळकले

साम्राज्यावर सूर्य जयांच्या कधींच ना मावळे
तयांच्या पाशांतुन मोकळे
व्हाया स्फुरले बाहु घरोघर त्याच ताम्हनामुळें

दुबळ्यांना अवसान लाभलें, ससे सिंह जाहले
जयांनीं अन्याय न साहिले
भीरुहि धैर्यें ल्याले भाळीं हौतात्म्याचे टिळे

० ० ०

जन्मा येउनि कर्तृत्वानें स्वकुळा उद्धारिती
आपुल्या पितरांना सुखविती
परंतु बालक कितिसे देती इतिहासाला गति

तोच जन्मला: परिस्थितीचे लगाम धरुनी करीं
ठेवुनी नज़र भविष्यावरी
'वर्तमान' जड शिन्त चालवी ज्ञानयोगियापरी

तोच जन्मला : पेटवि जो प्रक्षोभ जनांच्या उरीं
जयाची तेज अशी वैखरी
राष्ट्रपिता, सारथीच, साक्षात् योगेश्वर संगरीं

तोच जन्मला : दिग्गज चवऱ्या वारितात ज्यावरी
गातसे काळहि भाटापरी
तोच जन्मला : मरूनही जो चिरंजीव भूवरी

तोच जन्मला : शतकापूर्वीं, तेव्हां जें ताम्हन
घरीं त्या गर्जे आनंदुन
निनाद त्याचे घुमति युगांच्या बुरुजाबुरुजांतुन

जुलै १९५६

४

# चुंबुनि अंगार सुखें

मी जळते ! मी जळते !
चुंबुनि अंगार सुखें मी जळते मी जळते !

होते रसरसलेली
गर्धे मुसमुसलेली
परि जीवित माझें हें कुंठित–गति जड होतें.

चुंबुनि लावून आग
देइल मज कोण जाग
ध्यासानें एकच ह्या तिष्ठत मी उभि होते.

आला क्षण भाग्याचा
सफल होइ ती वांच्छा
अंगारें मज दिधलें चुंबन तें धगधगतें.

चुंबनेंचि जरि जळते
ज्वलनांतचि परि जगतें
तें चुंबनपूर्व जिणें काय कलेवर नव्हतें ?

ऐसें हें जीवित मम
होइ अतां उत्सवसम
जीवितांत एकमेव ऋतु वसंत अनुभविते.

मी जळते ? मी फुलते
फुलतांना दरवळते
आणि धूम्रवलयांतुन नाचत मी विरघळते

ऐशी मी धुंद फुंद
भरत भोंवती सुगंध
अंगारासंगतींत मी सतीच कीं जाते.

२२-९-५६

५

# सेवेस उभा मी

सेवेस उभा मी येथें सकलांच्याच
हा एकमेव हो माझा धर्मचि साच

ह्या सेवाधर्मीं मिळायचें कां कांहीं
हें विचारतां कां ? अपेक्षाच ती नाहीं !

मज एकच ठावें रघुनंदन तो दाता
मग कुणापुढें कां म्हणून पसरूं हाता ?

येतात घ्यावया सेवा माझ्याकडुन
ह्यामधें केव्हढा तरि माझा सन्मान !

जाणारे जातिल जरी समाधानांत
अधिकाधिक होतों तेणें मी श्रीमंत

मग जरी कांहिंही नुरलें माझ्या गेहीं
काळजी करिल तो सुदामजीचा स्नेही

करुं नको मना, तरि कुचराई कंटाळा
केव्हढा सोहळा पहा जीवितीं भरला !

◎ ◎ ◎

हे अंबारींतुन कोण उतरले खालीं
झोपडीच त्यांना काय सेव्य ही झाली ?

उतरलें कुणाचें विमान हें दारांत
ते विसावतीलहि इथें विटेवर श्रान्त ?

हे कोण ठाकले ? अमृताचे अधिकारी !
कळणाच येथला रुचे तयांना भारी

थबथबुन अत्तरामधें कोण हे आले
झारींतिल इथल्या तीर्थास्तव तान्हेले

हे नटुनीथटुनी आले कोणी राव
अंगारा म्हणती तुझ्याजवळचा लाव

हे माळा-मुंडावळ्या घालुनी कोण
पातले, टाकुं या लिंबलोण उतरून

लोटतात ह्यापरि थोर मान्यवर येथें
तरि महद्भाग्य कोणतें अन्य ह्यापरतें !

◎ ◎ ◎

येतीहि आणखी व्यथित कितीतरि अतिथी
ह्या कलंडावया जरा ओसरीवरती

बसुनिया त्यांचिया उश्या-पायथ्याजवळ
जाणुनी घेउनी खुपणारें तें कुसळ

काढुनी टाकतों अगदीं हलक्या हातीं
गोंजारुन टिपतों येणारें जळ नेत्रीं

पाहतों : सुरकुती विरते चर्येवरिल
नव उत्साहानें स्फुरूं लागते शीळ

टाकती आपुली पडशी पाठीवरती
अन् मार्ग आपुला चालुं लागती पुढतीं.

जन येती जाती हे जे येथ हमेश
ते कोण समजतां ? अहो ईश्वरी अंश !
जर कांहिं मागणें, एकच द्या हें देवा
मज समर्थ ठेवा नित्य कराया सेवा

१९५६

६

# पूर्वजन्मिंचें पुण्य

चालले पांथ हे कोणी रस्त्यांतून
लागो न तयांना पाउस किंवा ऊन
त्यांवरी धरावी छत्री, सोबत करुनी
ही कामगिरी योजिसी प्रभो, मजसाठीं
हें पूर्वजन्मिचें पुण्यचि माझ्या गाठीं

दाविती आपुलें कोणी गुणनैपुण्य
शतगुणित तयांचें व्हायातें चैतन्य
लागतो कराया घोष ‘ भले शाबास ’
भूमिका प्रभो, ती योजितोस मजसाठीं
हें पूर्वजन्मिचें पुण्यचि माझ्या गाठीं

सांगसी व्हावया अंधा-हातीं काठी
पांगळ्यास नेई वाहुनि म्हणसी पाठी
ह्या शोकार्तांना रिझवि सांगुनी गोष्टी
मज परोपरींनीं राबवितोस हमेश
हें पुर्वजन्मिचें माझें पुण्य विशेष.

गाजवून आले कुणी थोर तरवार
पाहिजे कराया त्यांचा जयजयकार
सुखदुर्बळ परि मी काव्यप्रतिभाहीन
चल घेउनि म्हणसी परडी तरि हाराची
प्रभु, पुण्याई ही माझी गत जन्मींची

० ० ०

निज कापुन घेउन नाक, करी अपशकुन
दे अमलांगीवर शेणखळा फेकून
        पाठींत चोरटा मारुनि ये खंजीर
कोवळ्या बालकां दाखवि बागुलबोवा
रे देइ उधळुनी जनीं खाजकुइल्या वा —

मज राबविता ह्या कोणी ओंगळ कामीं
तरि ठरतो पापी जन्मोजन्मींचा मी
        नुपजली वासना परंतु कधिंही तसली.
तेंवि ना कधींही झाली तसली सक्ती
प्रभु, तुझी मजवरी अगाध ही अनुरक्ती

डिसेंबर १९५६

७

# जाणें पुढतीं पुढतीं

मज ठावें अपुली चालुन जाणें वाट
वाटेंत लागुं दे माळ-रान वा घाट
विचकून कशाला मधेंच थबकुन राहूं ?
कां चंद्र थांबतो देखुनि केतू राहू ?

झडझडून पाउस किंवा कडकुन ऊन
लागेल वाटचालींत मला वरतून
मी बसूं गाळुनी हात-पाय कां म्हणुन ?
मज पुढें पुढें जाणेंच हाल अवगणुन.

कधिं वाटेवर उसळेल धूळ फोफाटा
लागेल ठेच कधिं, रुतेल अवचित काटा
निघतील सोलुनी तळवे, तुडवुन खरटें
भिववितील किंचाळुनी श्वापदें, भुरटे
हें भविष्य कळतें वर्तविल्याविण कोणीं
तरि पुढें पुढें जाणेंच सर्व साहोनी

साउली मिळेलहि, दिसेल कोठें बाग
सहजींच शमेलेहि जरा काहिली आग
कधिं कुरणावरल्या थंडगार झुळुकांनीं
मज अंगराग चर्चिल्यापरी सुख मिळुनी
येईल हुषारी—हमी न कांहिं परंतु
म्हणुनि कां प्रवासांतुनी मागुता परतूं ?

लादतील अपुल्या कुणी मजवरी गोणी
नेईन त्याहि, नच कुरकुरतां, वाहोनी
त्या गोणीमधला मुळीं न वांचिडन माल
मग म्हणो कुणी 'तूं केवळ काय हमाल ?'

"मिरवुनी होडगीं, पडाव, नावा, मचवे
सरिताहि हमाली करिते" म्हणुनी नांवें –
कोणी न ठेविलीं आजवरी जरि तिजला
मग हमालींत ह्या शरम कां तरी मजला ?

सरितेस्तव घेउनि रत्नांचा नजराणा
तो उभा समुत्सुक असतो सागरराणा
हें सांगुनि मजला हिणवूं बघतां व्यर्थ
मजलागीं नलगे कोणी सत्कारार्थ

फेकुं द्या चिखल वा दगड कुणी मजवरती
मज एकच ठावें — जाणें पुढतीं पुढतीं

१३-४-५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३२२४१ वि: ७१०७१
क्रमांक १५५५ नों: दि: २९/५/५९

८

# पूजा

हा कागद ? हो, कीं ! फुलें वाहतों ह्याला
तो दगडहि मजला पूज्य कोपऱ्यावरला
तें दार उघडलें जाण्यापूर्वीं तिथलें
त्याचिया उंबऱ्यावरीं ठेवितों झेले

◎ ◎ ◎

कागदांतुनी ह्या सरस्वती प्रगटेल
त्या दगडामधुनी फोफावेलहि वेल
उंबऱ्यांतुनी दरवळेल गोड सुगंध
हें पूजन चालें ह्याच भक्तिनें धुंद

उंबऱ्यांत अथवा कांहीं कुजबुज गोड
कधिं असेल झाली, तिच्या स्मृतीचे कोड–
हें असें पुरवितो रोज फुलें वाहून
भावार्थ असावा काय दुजा ह्याहून

संकेत भेटिचे सुफलित दगडापाशीं
म्हणुनि ह्या फुलांच्या काय तयाला राशी ?

असतील उमटल्या आणिक मुद्रा मूक
वरि असेल झाला अश्रूंचा अभिषेक
म्हणुनीच अतां त्या काय कागदावरती
ओंजळी फुलांच्या नेमें दरदिन पडती

ह्यापरी समजुती कोणी अंवतींभंवतीं
असतील ठेविल्या घोळत अपुल्या चित्तीं

◎ ◎ ◎

ही परंतु नोहे पूजा गतकाळाची
नोहेच पेरणी भविष्य पिकवायाची
जें सुकलें वठलें तें न पूजुनी फुलतें !
जें व्हायाचें तें काय फुलांनीं टळतें ?

हा वर्तमान त्या भूत-भविष्यापेक्षां
नटवुं या, रिझवुं या, केवळ हीच मनीषा.
परडींत माझिया फुलें जोंवरी जमतीं
ऐशींच तोंवरी वितरत राहिन भंवतीं

कोणतीहि नाहीं मनांत अन्य अपेक्षा
' हा नटवूं रिझवूं वर्तमान '–ह्यापेक्षां

२५-७-५७

९

# त्या दिवसापासुनी

त्या दिवसापासुनी हिंपुटी झाले चंदन तरू
लागले अंतर्यामीं झुरूं
"अम्हीच तिचिया सरणासाठीं निज काष्ठां अंथरूं
हीच मनीषा, मान, आणखी भाग्यहि हें आगळें
मनीं जें चिंतित होतों भले
आंचवलों कीं तयांस म्हणुनी मानस हें हळहळे!"

गंगा, गोदा, कृष्णा, यमुना, तुंगा, इंद्रायणी
आणखी कैक तीर्थवाहिनी
कुढत अंतरीं चरफडती किति त्या दिवसापासुनी-
कीं "अवतारी, संत, हुतात्मे, शककर्ते जे कुणी
तयांच्या अस्थी संगोपुनी
करंट्याच कीं अम्ही राहिलों तिच्या अस्थिवांचुनी!"

त्या दिवसापासुनी तुताऱ्या तोफा यांच्या मना
खंत कीं "अन्त्य मानवंदना
कराया न लाभली, भस्म ती होतांना अंगना!"

त्या दिवसापासुनी महोदधि सातहि हेलावतां
गर्जती एकच ही हृद्व्यथा
कीं "लाटांचे अतां चौघडे आम्ही पिटतों वृथा!"

कुसुमकोमला जातीची ती अबला पडद्यांतुनी
ठाकली जेव्हां समरांगणीं
नवीन हिंमत वरिते झाले दडले व्याघ्रहि वनीं

" मेरी झांसी नहिं दूँगी मैं " हे पडद्यामागले
बोल, छे, लोळच कीं उसळले!
हिमाचलाचें बर्फहि त्यांच्या धगीमुळें वितळलें.

वीरश्रीचीं तिचीं क्रीडितें पहावया त्या दिनीं
देवही अधीरलेले मनीं
नभीं दाटले नक्षत्रांच्या सरसावुनि दुर्बिणी!

धैर्यशालिनी रण-रमणीचें अतुल खड्गलाघव
वाटलें रुद्राचें तांडव
बघुनी लज्जित नरवर धरती तोंडावर पालव

परंतु निष्ठुर दुर्दैवाची सदाच मति वाकडी
व्यूह तें लावी देशोधडी
परसत्तेच्या कीं नाशाची भरली नव्हती घडी!

तिचाच आरंभिला तयानें पाठलाग सारखा
कृतान्तहि झाला त्याचा सखा
परतवि ती यमदूतां, झाली परंतु मरणोन्मुखा!

कुणासही नुमगले तियेचे अखेरचे आंचके
जरी ती वनस्थली चुकचुके—
'वैभवशाली अंत्यविधीला हाय, कलेवर मुके!'

ग्वाल्हेरीच्या शिवारांतल्या गवताच्या गंजिला
अचानकपणें आणि लाभला
मर्दानी राज्ञिच्या चितेचा मान केव्हढा भला!

गंज जळाली, परि जळलेल्या गवताचे कणकण
राहिले भारतांत विखरुन
फुलवित तेजोहतांचिया मनिं अंगारा निशिदिन

त्या दिवसापासुनी तृणाच्या पात्यापात्यांतुनी
राहिली अग्निशिखा पेटुनी
श्रेय दिव्य हें ! –वैभवशाली दहन-विधी वांचुनी !

त्या दिवसापासुनी म्हणोनी तीर्थें, चंदन, तरू,
नगारे, सिंधु, लागले झुरूं
कीं " मानाचे मुजरे अंतीं तिला न शकलों करूं."

६–९–५७

१०

# घडाव्या आपुल्या भेटी

[ गज़ल – वियद्‌गंगा ]

जहाली आपुली भेट निघाल्या मागल्या गोष्टी
पुन्हां दृष्टीपुढें आली गतायुष्यांतली सृष्टी.

मनीं संकल्प केलेले तडीला कोणते गेले
मनीं अंदाज केलेले खरे खोटे कसे झाले

भरोसा मानिला ज्यांचा कसा त्यांनीं दिला धोका
अपेक्षाभंग,—छे, भाळीं किती रक्ताळल्या खोका !

भराऱ्या घ्यावया जातां कुणीं हे कापिले पंख
हुकोनी चंद्रकोरीचा मिळाला धूळ-पर्यंक

तयांच्या आणि हें नाहीं मुळीं आलेंच ध्यानांत
असें प्रस्थापिती ते कीं ' दिलें ह्याला अम्हीं स्वास्थ्य '

फुगा त्यांच्या भ्रमाचा तो दिला ठेवून टांगून
तयाच्या नांदलों संगें दिखाऊ मोद मानून !

उरीं सांभाळिलें व्रीडा, न गेलों वांकडी वाट
न आला लौकिकामाजीं जरी मांडावया थाट

तरीही ना दिली त्याची मनाला खंत वाटून
जरी भांबावलों केव्हां निराशेनें झपाटून.

प्रयत्नांची पराकाष्ठा करोनी साधिलें काय ?
पणाला लाविली प्रज्ञा, दुजांनीं लाटिलें श्रेय !

कुणी मोठे कसे झाले त्यजोनी न्याय-अन्याय
जळाले कोण अन्यांना दुधाची द्यावया साय

अशा त्या बोलतां गोष्टी उमाळे दाटले पोटीं
क्वचित् पाणावले डोळे, मिळालीं आसवें ओठीं

अशा ओलावल्या ओठीं रुची ये वर्तमानाला
पराभूतीसही कांहीं तजेला आगळा आला.

उमाळे दाटुनी याया निघाव्या मागल्या गोष्टी
अशा बोलावया गोष्टी घडाव्या आपुल्या भेटी.

११-९-५७

११

# पंच पंच उषःकाल

पंच पंच उषःकाल
किती सुहूर्त मंगल
लग्न-घरीं लताकुंजीं
माजे केव्हढी दंगल

चिवचिव चिमण्यांची
किती कल्लोळ गोंधळ
मधमाशांची मिष्कील
त्यांत चाले धावपळ

पाकळ्यांच्या मंडपांत
सुगंधाचें स्वयंवर
रंगकिमया नोवरी
जोडा जमला सुंदर

तेथ पराग बोहलें
झाली हात-मिळवणी
कल्कलाट आरंभिला
अधिकच चिमण्यांनीं

तोंच सहस्ररश्मीचा
रथ दाराशीं ठाकला

गंध-सुरंगा दंपती
निघाले कीं वरातीला

लगबग चिमण्यांचा
पडे घोळका बाहेरी
आणि झाली सामसूम
लताकुंजीं लग्न-घरीं

११-९-५७

१२

# जगलेंच पाहिजे मला

" जगलेंच पाहिजे तुम्हांस माझ्यासाठीं "
ही मुलानेंच हो दिली मला दमदाटी
म्हणुनीच पहाटे रोज फिराया जातों
परिपाठ तयाचा चालविणें मजला तो

हे गरम लोकरी कपडे त्याचे सगळे
मी वापरतों कीं लावुनि किंचित् ठिगळें

लावितों तयाला आवडणारीं गाणीं
सजवून ठेवितों मेजावर फुलदाणी

किति आवडती ही भाजी त्याची – मेथी
जोंवरी मिळे तोंवरी आणितों मी ती

दावितों जेवणापूर्वि तया नैवेद्य
तिकडेहि तया कां व्हावि न रुचि संवेद्य ?

वारसाच माझ्याकडे तयाचा आतां
तो सांभाळाया हव्या खावया खस्ता.

० ० ०

फिरफिरुन बजावुनि गेला मजला बाळ
" करुं नका आपुली हेळसांड आबाळ "

गळणार कधींतरि हें पिकलेलें पान
किति जपूं तयाला करुनि जिवाचें रान

मुखिं घोकत होतों हेंच पालुपद रोज
अन् वागत होतों करीत हयगय सहज

ही विचारसरणी परि न तया कधिं रुचली
ही म्हणुन असावी ताकिद त्यानें दिधली

हें म्हणून खाणें-पिणें नि औषध-पाणी
ठेविलें असें मी अचुक नित्य नियमांनीं

जर दुखलें-खुपलें मजला कांहीं इकडे
तरि तयास हुरहुर लागायाची तिकडे

सुखरूप एकदा परतुन आल्यावरि तो
हा खटाटोप मग कोण एव्हढा करतो ?

१४-९-५७

१३

# गीत माझें, रूप तुझें

गीत माझें, रूप तुझें.
भाव माझे, ओठ तुझे,
सूर माझे, ऊर माझें,
फक्त ते निःश्वास तुझे.

ह्या मिलाफानें परंतू का मला कांहीं मिळालें ?
मात्र वाट्याला तुझ्या तें प्रीतिचें साफल्य आलें

संगमीं ओठांवरी, प्रेमोत्सवीं आलिंगनानें
लाभती तूतें तयाच्या प्रीतिचीं औदार्य-दानें

माझिया प्राणेश्वराची गुंफिली मी प्रीत-पूजा
त्याजला कैसें कळावें ती तुझ्या ये प्रीत-काजा

○ ○ ○

" प्रेम लाभे प्रेमळाला ",
कायदा हा पूर्ण खोटा
प्रेम लाभाया हवा कीं
रूप-राज्ञीचा मुखोटा

रूपराज्ञी ! ह्या यशाचें लाभलें सौभाग्य तूतें
रंगुनी तूं त्यांत जातां वाटतो हेवा न मातें

कंठ तूझा चुंबितां तो चुंबितो मत्प्रेमगीतें
तूझिया आलिंगनीं तो प्राशितो मद्भावनेतें

तूझिया रूपीं तयाशीं मीच पावे संगमातें
आकळे माझें नि त्याचें केंवि कोणा प्रेमनातें

१७-९-५७

१४

# पांढऱ्या ढगांनो !

[ जाति–आत्मवञ्चना ]

पांढऱ्या ढगांनो ! व्योमीं व्यर्थ मिरवितां !

तान्हेली व्याकुळ धरणी
आक्रन्दे ' पाणी ! पाणी ! '
भावशून्यतेनें तुमच्या होइ वञ्चिता

जातकुळी तुमची पुसतां
' जलदांची ' —सांगत सुटतां
परि न तुम्हांपाशीं त्यांची थेंब आर्द्रता !

आकाशीं जिकडे तिकडे
फडकवीत फिरतां झेंडे
एव्हढा पराक्रम घडला थोर कोणता ?

मिरवितां पिसारे नुसते
झुलवितां बिचारे जन ते
जेंवि कठिण-हृदयी प्रमदा रूपगर्विता

झगमगते जेव्हां कान्ती
तेधवां स्वयंभू कां ती ?
नटुनि भानुतेजें उसन्या का कृतार्थता ?

पसरुनिया चोची चातक
तिष्ठति का लावुनिया टक
चित्तकोष जरि दात्यांचा कोरडा रिता

धवलिमा तुम्हां जरि भूषण
साध्य न तो, तें तर साधन
काय भस्म-चंदन-लेपीं साधुशीलता ?

टाकल्या पिकांनीं माना
गोठल्या गळयांतच ताना
जीव कला मरणोन्मुख !—त्यां काय जिवविता ?

उलट नभीं वावरतांना
लपवुं पाहता रविराणा
वाढविता तगमग ! कसल्या साधतां हिता ?

दिसती जे काळे-कळकट
बंधु बरे तुमचे शतपट
करिति भूमि सुजला सुफला संपुनी स्वता

१८-९-५७

१५

## महात्मन् ! करतों जयजयकारा—

महात्मन् ! अपुल्या जयजयकारा—
करतात झंकृती युगायुगांच्या तारा ॥

आपुले चरण हो जिथेंजिथें संचरले
पददलित वाळल्या तृणापरी जे तिथले
तरतरले, नुरले हीन दीन वा दुबळे
पदतीर्थचि त्यांना होय सुधेच्या धारा ॥ करती जयजयकारा ॥

वाणींतुन अपुल्या जे जे बोल निघाले
संभ्रमांत रुतल्यां ते ते मंत्र जहाले
अडथळे कैंचि ते गणतिल मार्गांमधले ॥
ते चालुनि जाती अनवाणी असिधारा ॥ अपुल्या जयजयकारा ॥

व्यथितांच्या पाठीवरी फिरवुनी हात
अन्याय–पीडितां कैवारी झालांत
शिकवुनी तयांना सत्याग्रह पुरुषार्थ
उभविले पाशवी जुलुमांच्या प्रतिकारा ॥ करतों जयजयकारा ॥

संदेश निघाले घेउन अपुला जे जे
ते तमास वारित फिरले अपुल्या तेजें
ध्येयानें नटल्या मग सामान्यहि मनुजें
जिंकिलें बलाढ्यहि शस्त्रसज्ज दलभारा ॥ करती जयजयकारा ॥

जे कत्तल करुनी ठरती समरीं गाजी
त्यांचेच पवाडे गाती जगतामाजीं
ही नीति कोणती वैरभाव पिकवी जी ?
हा सवाल झाला शास्त्यांनाहि दरारा ॥ अपुल्या जयजयकारा ॥

'देउनी जयाचें त्याला, जा माघारा'
हा निर्वाणीचा झडतां बोल-नगारा
आसेतुहिमाचल, पश्चिमपूर्व किनारा
कवळाया सजला कारा, शूल, निखारा ॥ अपुल्या जयजयकारा ॥

बलिदान ह्यापरी घडलें दिव्य अचाट
शिवशक्तिपुढें ह्या होति नम्र सम्राट
मग कुंकुममंडित व्हावें कां न ललाट ?
स्वातंत्र्य-देविला हिंद होय देव्हारा ॥ करतों जयजयकारा ॥

परि पुन्हां काजळी चढेल ज्योतीवरती
भवितव्यावरली ढळूं पाहते दृष्टी
ती खिळून राहूं बघते स्वार्थीं नुसती
ह्या भयें घाबरा जीव होतसे सारा ॥ अपुल्या जयजयकारा ॥

तरि पुन्हां एकदा घेउनि या अवतारा
या, पुन्हां सावरा डळमळता डोलारा
या पुन्हां शिडामधिं नवा भराया वारा
या, पुन्हां उकलवा आज गोठला पारा ॥ करतों जयजयकारा ॥

३०-९-५७

१६

# पाथेय

आलीस तूं कशाला ?

आलीस तूं कशाला ? आहे जरी इथें मी
नोहे महाल मी हा ओसाड धर्मशाळा !

नाहीं कधींच पेला जो लागला मुखाला
लावून तो अतां कां आणूं उणें व्रताला ?

नेत्रांपुढें तरंगे आतां न स्वप्नसृष्टी
तीच्याविना रुची वा शोभा न जीविताला

होतें उधाण पूर्वीं तो शुष्क सिंधु झाला !
वैराण वाळवंटीं नौका अतां कशाला ?

कां ह्या त्वदागमीं गे ग्वाही निरंतराची ?
आतां परी कितीसा मुक्काम राहियेला ?

कानांत नादते जी घंटा खणाखणा ती
[ इतरां न ऐकुं येवो ] सुचवी प्रयाण-वेळा

आलीस तूं म्हणोनी खेचून साखळी कां
मुक्काम लांबवाया येई मुशाफराला ?

होतों तृषार्त जेव्हां प्याया झळा मिळाल्या
त्या प्राशुनी जिण्याचा झाला पुरा उन्हाळा

तृष्णा मरून गेली बीजें जळून गेलीं
कां राख अंकुरे ती जरि शिंपिलें जळाला ?

" झाला उशीर, याची माफी करा दयाला ! "
नेत्रांत याचनेचा दाटे तुझ्या उमाळा !

आलीस ह्याचसाठीं ? हेंही बरेंच झालें !
ही भेट, हा उमाळा पाथेय यात्रिकाला

१९५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

१७

# नाटक झालें जन्माचें तें

(स्वगत)

" अजुनि खुळा हा नाद पुरेसा तरि कैचा होइना
नाटक झालें जन्माचें तें मनिं कां हो येइना ? "

जुन्या चालिच्या पदांत अपुली चीड सदा ओतुनी
निखंदिसी तूं संसारांतिल माझी सहचारिणी.
रंग, वेश, भूषणें चढवुनी वठवितसे भूमिका
तादात्म्याच्या यशस्वितेच्या करिती जन कौतुका
टाळ्यांचा कडकडाट, गौरव, कौतुक तें भोगुनी
अधिकाधिक मी काय चाललों नाटकांत रंगुनी ?

यशस्वितेची काय चढावी मजला इतुकी नशा –
जेणें वास्तव संसाराची करुं सजतों दुर्दशा ?
वास्तव आणिक नकली यांतिल भेद न कां मज कळे ?
प्राकृत अर्थाहुनी परंतू जीवित मम वेगळें,
नाटक झालें जन्माचें, तें अनुभवितों मीच कीं
निखंदिसी तरि कशास मजला संबोधुनि नाटकी ?

◎ ◎ ◎

दैवानें मज केलें कैदी ठोकुनिया शृंखला
व्यवहारीं परि खळखळ कोठें घालूं येते मला ?
रंगभूमिवर संभाजीची बजावितों भूमिका
क्षुब्ध भावनोद्रेकामधिं त्या खराच जगतों न कां ?

अपमानित मी मान खालती घालुनि असतोच कीं !
रंगभूमि सोडुनी क्रमूं का अशीच यात्रा मुकी ?
त्याहुनि शिंदा दत्ताजी मी रंगभूवरी रणीं
मरतां जगतों मत्त शत्रुवर रक्त-चूळ थुंकुनी.

शालु पैठण्या पेहरतां, मज हसतिल जन भोंवतीं
म्हणुन सदाशिव भाऊची त्या होउनिया पार्वती
पतिव्रतेचीं गाळितसें मी खरींखुरीं आंसवें
जगलों कांहीं असें वाटतें अशा भूमिकांसवें

◎ ◎ ◎

जन्म कोणत्या कुळीं पाहुनी तुळितां कां पौरुषा ?
जीव तोडुनी राधेयानें सवाल केला असा.
शतकांमागुनि शतकें गेलीं; कन्यादानीं परी—
अजुनि वराच्या जात-कुळीचा विचार जो तो करी.
छिन्नभिन्न तो म्हणुनि कराया दगडी बहिरेपणा
पुनःपुन्हा राधेय होउनी घालितसे त्या घणा.

चुकुन कधीं मज दिसून माझी येइ मनोदेवता
व्यक्त तिजपुढें करूं न शकतों प्रणयार्तांची व्यथा
म्हणून होतों 'जयंत' आणिक तुडुंबल्या भावना—
वाहवितों कल्पुनी प्रणयिनी अवघ्या प्रेक्षक-जनां.

नको तिथें लागतें रिघावें सेवाधर्मी मला
सैरंध्रीच्या विटंबनेच्या म्हणुन वठवितों कळा

अनिच्छया शिंपितों नको त्या देहसुखाचा मळा
आणि साहतों मुकाट अवघ्या डसणाऱ्या इंगळ्या
ह्याच अनुभवें परि मज येतें व्हाया वारांगना
रंगभूमिविण वाव कुठें कां व्यक्त कराया घृणा ?

रंग फासतों, वेश बदलतों, आभरणें चढवितों
अहंपणानें रंगभूमिवर आणि खरा नांदतों
आणिक वास्तव व्यवहारामधिं केवळ नट मी उरें
नाटक झालें जन्माचें तें ह्या अर्थानें खरें

अजुनि खुळा हा नाद पुरेसा तरि कैचा होइना
ध्रुपदानें ह्या वेडावुनि कां निखंदिसी ह्या जना ?
संसाराचें नाटक सुरळित चालतसे ज्यामुळें
नाद ' खुळा ' तो म्हणणारे कीं तुम्हीच सगळे खुळे ?

२९-८-१९५८

१८

## नाहीं म्हणूं कशाला ?

नाहीं म्हणूं कशाला ? आहेस ईश्वरा तूं
रूपें दशावतारी तितकींच का परंतू ?
भक्तांस ज्या स्वरूपीं आलास तूं दिसोनी
वर्णून ठेवियेलीं ध्यानें तशीं तयांनीं
त्या वर्णनानुसारी देवालयांत मूर्ती !
माझ्या परी चरित्रीं त्याची कुठें प्रचीती ?

या यात्रिकास मार्गीं जें सौम्य रौद्र भेटे
जावें पुढेंच लागे स्वीकारुनी तयांतें
त्यांतून पार होतां जाणीव मात्र आली
होतीं तुझींच रूपें तीं वेगवेगळालीं.

आल्या पुढें समस्या, तैशाच विघ्नराशी
दिधला मुकाबला मीं मति-शक्तिनें तयांशीं
झुंजूनिया तयांशीं होतों विसावलों मी
तों स्पष्ट जाणिवेच्या आलें दिसून व्योमीं-
आघात, लाभ, हानी, ते स्राव शोणिताचे
तीं संकटें, समस्या, -तें लास्य ईश्वराचें

तैसेंच कैक वेळां नाना प्रलोभनांनीं
केले प्रयत्न मातें न्यायास आडरानीं
कर्तव्य देत आलें हरवख्त तों इशारे
कर्तव्य तें नव्हे का तव रूप ईश्वरा रे

वेल्हाळ अंगणींचा,
पान्हा फुटे जयांनीं
सौंदर्य पाहुनीया
डोळे तुडुंब माझे
त्या आसवांस होतीं
अमिता, अगा अगाधा,

दारांतला भिकारी
रूपें तुझीं मुरारी
तें दैन्यही बघोनी
होतात आसवांनीं
जीं जीं अशीं निमित्तें
तव साक्ष येइ तेथें

जे याचितात देवा,
तपशील त्या कृपेचा
त्यांना हवी समृद्धी
ही त्यांचिया हिशेबीं

तुझिया सदा कृपेतें
कथितील कोणता ते ?
लोकीं परोपरींची
व्याप्ती तुझ्या कृपेची

करुणाष्टकें, भुपाळ्या,
गातात ते म्हणोनी
त्या सांप्रदायिकांचीं
वा देवदर्शनाला!
समृद्धि साधियेली
तृष्णार्त राहुनीया

स्तोत्रें नि आरत्या त्या
तुजला जगन्नियंत्या
स्तोत्रें तशीं न गातां
ना देवळास जातां
मीं माझिया प्रवासीं
किंवा कधीं उपाशी

दुःखें, सुखें, निराशा,
हा घाम, रक्त, अश्रू,
वाटे न लाज ज्यांची,
त्यांना मदीय देहीं

तैसेच हे उमाळे
जे जे फुटून आले
वाटे न खंत ज्यांची
शोभाच दागिन्यांची

स्फूर्ती कुठून आली ?
कोठून अंधकारीं
मार्गी अशी समृद्धी
रूपेंच का न देवा,

शक्ती कुठून आली ?
ज्योती फुलून ठेली ?
जी नित्य होत आली
तीं त्वां अनंत ल्यालीं ?

१९

## वाट –

चाललें वाट मी पुढतीं पुढतीं
घेऊन वळणें लवणें हीं किती
चढतें गिरी, धुंडते दरी
रिघतें कधीं गर्द कांतारीं
एखाद्या नगरा घालतें वळसा
कटीवरला कीं गमे तें कळसा

एखाद्या खेड्याला टिचकी मारून
जातें ओझरतें देऊन चुंबन
एखादें दुरून माझी पायधूळ
लेवून अंतरीं जोजवीतें खूळ
ओसाड गढी, भंगले तट
धर्म-पताका-विदीर्ण मठ
हलकेंच जातां त्यांच्या जवळोनी
कहाण्या, उसासे पडतात कानीं

आडव्या आलेल्या नदीच्या कुशींत
घुसतें, नदी ती येई तैं खुशींत
परन्तु लगेच जातें पैलथडी
नदीच्या खुशीची मोडतां न घडी

कधीं ये स्वागता फेसाळ सागर
लेजीम खेळत आदर-निर्भर

फेनिल फुलांचे हार-तुरे घेत
थबकतें त्याचें कौतुक पाहात
ओसरल्यावर
भावनेचा भर
जेधवां सागर वळतो माघारा
निसटतें तया देऊन गुंगारा
गुंगारा ?—
गुंगारा नव्हेच; असतें तिथेंच
परंतु सागरा पडतसे पेच
होऊन जागृत भांबावल्यागत
चोहींकडे मला राहतो शोधत
अनंतरूपिणी आहें मी करत—
चारीहि किनाऱ्यां- संगत लगट
देखून थिजतो मनांत बिचारा !
काय होय मला कुणाचा उबारा ?

घोटाळतें कुठें थोर नगरींत
रुचेचि ना परि तिची चालरीत
दौडती धांवती पिसाट वाहनें
रेंगाळती कोणी बेफिकीरपणें
त्यांत पादचारी कोणी धांदरट
पांगळे त्यांतून जाती सरपट
लखल रोषणाई आरसे-महालीं
गान-नर्तनाची मैफल रंगली
परंतु तिथेंच वळचणीखालीं
उष्टयाला महाग कंगाली झोपली !

घाली कधीं स्नान दुधाची घागर
रक्ताचें थारोळें कधीं अंगावर

अभिसारिकेची वेणी ही गळली
प्रेतावरलीं हीं फुलें विखुरलीं
इथें चितारली रांगोळी सुंदर
इथें चटचटे ओतलें डांबर
कशाचें सुख ! कशाचें दुःख !
स्वर्ग नरक सारेंच एक !
सदा-सर्वकाळ गर्दीच सारखी
माझी मलाच मी जाहलें पारखी !

येऊन शिसारी राजधानींतून
पळत सुटतें वेशी-वेशींतून
चढतें गिरी, धुंडतें दरी,
आणि रिघतें गर्द कांतारीं
तेथें मीच होतें मला सोबतीण
सवड सांपडे जाणाया मी-पण.

११-५-१९५९

२०

## वेगाचीं विलसितें

बसुनि धांवत्या गाडीमाजीं
आहें मी निश्चल
परंतु बघतों धांवत सारें
विश्वचि बाहेरिल
समीपचीं हीं झरझर जातीं
शेतें, तरु, कुंपणें
आणि दूरचीं उलट दिशेनें
धरुं बघतीं रंगणें
नसलेली ही लेउन ऐशी
नवीन गतिमानता
क्षितिजावर टेकड्या दूर ज्या
उभ्या अचल सर्वथा
त्यांनीं देखिल धरिला आहे
फेर वर्तुळाकृती
भास होइ हा आणि त्यासवें
विस्मित होई मती
स्वभावेंचि जी असे अखंडित
पुढें पुढें वाहत
तीहि फेर धरि नदी शिवारा—
सांगातीं गुंगत.

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२७९६

काय चेष्टितें मजलागी हीं
दावितात वाकुल्या
पुसून ‘ कसली ऐट मिरविसी
मुशाफिरा रे खुळ्या ? ’
आणि खरोखर अवलोकुन हीं
वेगाचीं विलसितें
शंकाकुल मानसीं माझिया
कांहीं हेलावतें
बसल्या जागीं खिळलेला मी
पुढें पुढें जातसे
आणि भंवतिचें बद्धमूल हें
विश्व फेर धरि कसें ?
कुणा म्हणूं स्थिर ? कुणा म्हणूं चर ?
पडतो हा संभ्रम
गति एकाची दुजा मिरवितो
मुळीं न घेतां श्रम !

नक्षत्रें, रवि, चंद्र धांवती
त्यांची गतिमानता
नसेल दुसऱ्या कुणा ग्रहाची
काय परावर्तिता ?

१९५९

२१

# सल

“ ट्यां ! ट्यां ! ” तें
जगतामधलें पहिलें-वहिलें
जेथें माझें गाणें फुटलें
बाळंतिणिची खोली कोंदट
दूर आडवळणी तें खेडें !
    विश्व कधीं तें पुन्हां न दिसलें
    आजवरी जरि मुशाफरीमधिं
    उलटुनि गेले साठ उन्हाळे

◎ ◎ ◎

शिवारांतल्या वाऱ्यासंगें
पेंगत गोते खात झिंगुनी
फडफडणारें फूलपांखरूं.
तसेंच होउनि मानस माझें
डुलत्या हिरव्या कुरणामधुनी
झऱ्यासारखें असतां लोळत
किलबिल गुणगुण निरर्थ गाउन
लाजविली, रिझविली, फुलविली
शारदलक्ष्मी बांधावरली.

कधीं न तीचें दर्शन फिरुनी घडलें
आजवरी जरि
कैक हस्त ते कोसळुनीया रिते जाहले !

◎ ◎ ◎

तापत होता भास्कर वरती
लाही होती फुटत खालतीं
कुठेंहि नव्हतें झाड झुडुप वा.
अनवाणी पावलांस होत्या न्हाऊं घालित—
धगधगणाऱ्या धूळ-चुळा.
पायवाट ती आडबाजुची असतां तुडवित
ऊनहि झालें चांदण्यापरी
धूळ जाहली उटी चंदनी
संगतींत ज्या पिसाट उत्कट
तो न कधींही पुन्हां मिळाली
जरी मृगजळें लहरुन पुढतीं
वेडावुनि दरसाल दाविती.

◎ ◎ ◎

ती पोर परकरी — शिष्या शेजारील
तो पंतोजीही तिचा पोरसवदाच
‘ मज सांगतोस का अन्वयार्थ कवितेचा ? ’
‘ हें गणित एव्हढें पहा कुठें रे चुकतें ? ’
आणुनी ह्यापरी शंका रोज विचारी
आणि तयांचें मीहि निवारण करी
“ जोडुनी घ्यावया हवा पुढिल तो चरण ”
“ विसरलीस आणिक कसा येथचा हातचा ? ”
समजावुन देतां, खजिलपणानें लटक्या
ती लाजत, हासत, खुषींत जाई निघुन

फडफडतो परकर धावत जातां पुढुन
ती फडफड कानीं आहे घुमत अजून.
परि अतां कोण ती ?
        असेल विदुषी ? गृहिणी ?
कां असेल तिचिया संसाराचें गणित
        हातचा न घेतल्यामुळें पार चुकलेलें ?
कां असेल घोकत त्या कवितेंतिल पहिले
        सुरुवातीचे केवळ दोनच शब्द बिचारे
        " असार जीवित..." असार जीवित सारें ?

ही प्रश्नपत्रिका—
ह्या विजा चमकती संतत अंधारांत
सोडिती सतावुन गुरुजीला दिनरात
धुंडतों परकरी शिष्या दशदिक्प्रान्तीं
चमकत्या विजांतुन—
        परी फिटे ना भ्रान्ती.
जीवितांत जो तो
अखेर होतो
        कुंठित-मति विद्यार्थी

२-१०-५९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....... वि: .......
क्रमांक ....... नों: दि: .......

२२

# शीर कपाळावरली

ही स्फुरण पावते शीर कपाळावरली
ही शुभाशुभाची काय सूचना ? कसली ?
अशुभासहि मिरवी गणुनि भूषणासम जो
सूचना तयाला हवी कशाला असली ?

कीं ललाट-रेषा उमटे आज नव्यानें ?
कोणतें यापुढें भाग्य परंतु येणें ?
ऋतु–वयोमान जरि पुरुषाच्या नच भाग्या
खडकावर कैशीं बहरतील हो कुरणें ?

ही भाळावरली शीर पावते स्फुरण
कीं प्रतिभा जुळवी नव कवितेचा चरण ?
परि मिळे प्रतिष्ठा पदवी–धन–सत्तेला
व्यवहारीं कविता कंट-लक्षण जाण.

ही कंपन पावे कीं वीणेची तार
लाविते सूर का षड्ज, ऋषभ, गांधार ?
‘ मल्हार ’ म्हणे जो कल्हाराची जाति
वीणाहि लोढण्याहुनी तयास कहार

कीं निशाण फडफडतें हें निटिलपठारीं
डळमळत्या योद्ध्या द्याया काय हुषारी ?
परि ‘ हता स्वर्ग, जेत्यास राज्य ’ हें ल्याला
जो चिलखत, तो का चळेल संसृति–समरीं ?

कीं अदृष्ट कोणी वाचुनि आहे बघत
हें स्फुरण शिरेचें पुटपुटणें तें गमत ?
परि लिपी नि भाषा सांकेतिक जर सारी
हें वाचन काय न उगाच कटकट व्यर्थ ?

कीं होउं पाहतो जागृत तिसरा नयन ?
करितात पापण्या उघड-झाप — हें स्फुरण ?
परि दाहक दीप्ती असेल का त्याच्यांत ?
अन् करायचं तरि मला कुणाचं दहन ?

ही भाळावरली स्फुरण पावते शीर
कीं सिंधुमंथनीं गिरगिरतो मंदार ?
संभवेल रत्नावली त्यांतुनी परि कां ?—
जरि नसेचि जीवित अगाध पारावार !

ही स्फुरण पावते भाळावरली शीर
संबद्ध न तिजशीं भलें-बुरें तकदीर
हें परोपरींनीं ठावें असुनी मात्र
बेचैन होतसे, सुटुनि मनींचा धीर.

५-१०-५९

२३

# होतां तुझी आठवण–

होतां तुझी आठवण
मनीं माजतो गोंधळ
तोच अबोध गोंधळ
करी जीवातें व्याकुळ

◎ ◎ ◎

यावा दिसोनी यात्रिका
रानीं झरा उच्छृंखळ
कांठीं भटकावें त्याच्या
होऊनिया अवखळ

लवलवून लव्हाळे
जळ झऱ्याचें चुंबिती
चुंबनाच्या थरथरी
लव्हाळ्यांत हेलावती

कांठावरली हिर्वळ
तिला कोठून चुंबनें
परि देई जलवंती
तिला तुषारांचीं दानें

लव्हाळ्यांचा हिर्वळीचा
हेवा करावा कशाला
बोलावितसे कातळ
ओल्या हवेनें भिजला

कलंडून त्याचेवरी
वळुनिया कुशी पोटीं
घ्याव्या भरून ओंजळी
जलवंतीच्या दौलती

जलवंतीच्या दौलती
फेन-फुलांचे पुंजके
भावकल्लोळामधून
मौक्तिकांचीं कीं तबकें

अशी दौलत फेसाळ
घेतां भरून ओंजळ
ओठ होती उतावीळ
स्पर्श-सौख्या त्या फेनिल

स्पर्श-कल्पनेसरशी
उठे शिर्शिरी झर्कन
सारी दुनिया स्वप्निल
क्षणीं पावे अंतर्धान !

स्वप्नभंगाचा चुराही
काय लागणें हातास ?
स्वप्नभंगाच्या वेदना
करितात कासावीस

वेदनांनीं तल्खलीनें
जीव होऊन व्याकुळ
उचलाया पाऊलही
पुरे यात्रिकास बळ !

◎ ◎ ◎

होतां तुझी आठवण
मनीं माजतो गोंधळ
दिसे गोंधळाच्या तळीं
फेन-माखला कातळ
बिलगून कातळास
एक यात्रिक स्वप्निल.

सारें अंधुक अंधुक
कांहीं होईना उकल
जीव होऊन व्याकुळ
पायीं भरतें मरगळ.

१०–११–५९

२४

## मी कोण काय देणार ?

अहो, मी कोण काय देणार ?

नळांतुनी या पडतें पाणी
म्हणुनी नळ का उदार-पाणी ?
पहा तयाच्या उगमस्थानीं
उंचावरती जलसंचय तो भरला अपरंपार.

तुडुंबलेले पयोद गगनीं
खालीं आसुसलेली धरणी
तरि बरसावे कां न तयांनीं
कृतार्थ-जीवित तयां व्हावया हाच धर्म आचार.

झारीमधल्या पडत्या सलिला
रोधायातें येइल मजला
परी फोडतिल माझा डोळा
गरजू बांधव, चीड तयांची झाल्यावर अनिवार

अपश्रेय तें टाळायातें
देतों जें जें हातीं येतें
तुम्हीच भर्ते पोषणकर्ते
उदारपण हें तुमचें; केवळ मिरवी मी शृंगार

देखुनि दगडांतलें देवपण
अभिषेकातें बसले ब्राह्मण
पावन तीर्थानें इतरेजन
मी हा गोमुख – ज्यांतुन झरते त्या तीर्थाची धार.
अहो, मी कोण काय देणार ?

२६-११-१९५९

२५

# गुटमळतें मन

गुटमळलें मन माझें, अडखळले चरण जरा
परि ढकली पानातें नियतीचा पुढतिं झरा

नियतीचे भिन्न झरे एक तुझा, मज दुसरा
एक दिशेनेंच जरी भ्रमणारी सतत धरा

मीनलिया भिन्न झरे भिन्नता जलीं न उरे
मनुजांच्या संगमांत सत्य हें न नित्य खरें

टाचुनिया पानाशीं पान, घडे पत्रावळ.
तींच घालतात पुढें चोयांशीं परि खळखळ

चोयांचें ढळतां बळ एक एक गळतें दळ
तेंवि होइ मनुजांचा संगमही पुढति विकल

येउनिया निकट झरे अलग अलग वाहतात
कांहिं दुरावून, ऐक्य अनुभवती अंतरांत

गुटमळतें म्हणुनी मन अडखळती चरण जरा
जरि पुढतीं पुढतीं मज नियतीचा लोटि झरा

येउं पुन्हा व्हावयास कधिं सदेह एकरूप ?
कीं अपुल्या प्राक्तनांत शिक्षा ही जन्मठेप ?

२७-११-१९५९

२६

## स्वप्न पाहिलेंस, मना !

स्वप्न पाहिलेंस मना !　　त्याचा कां घेसि छंद ?
मिळतिल तुज त्यांतिल कां　　ते सुगंध, ते मरंद ?

सोडुनि संकोच आणि　　तोडुनिया रूढि-बंध
स्वप्नामधिं चंद्रकोर　　होउनिया प्रणयधुंद—

शिंपडुनी अमृतबुंद　　अधराशीं कुजबुजली
त्या अधरीं फिरवतोस　　वरचेवर कां जिभली ?

मृगजळ तें, त्याचा कां　　ध्यास घेसि व्यर्थ असा ?
अधिकाधिक कोरडाच　　व्हायाचा मात्र घसा !

सांगुनि हितबोध तुला　　उपयोग न कांहिं परि
तूं चालत राहणार　　कवटाळुन स्वप्न उरीं

" वाट असो काटेरी,　　रणरणोत गरम झळा
काय तया, चाले जो　　चिंतित स्वप्नेंदु-कला ?

कुंद हवा गमत तया　　गंधमयी सुखशीतल
कितिहि पडो शोष, तया　　भान कुठें ? तो न विकल "

सांगुनि हें तूंच मला　　पुसशिल कीं " रे चतुरा
स्वप्नस्मृति-गंगाधर　　काय जुमानिल जहरा ? "

२७-११-१९५९

२७

## मजे इथें हें

मेज इथें हें खोलीमाजीं
दिवा तयावर भव्य टांगला गोल
काळोख्याही रातीं
दिव्यांतुनी ह्या सूर्य उघडतो डोळा
अहो, जयाच्या उजेडांतल्या
वस्तूंना नसतात सावल्या !

झकपक सारी मेजावरती
सर्व चकाकत अवतींभवतीं
कपाटांतुनी झगमग करती
—नोहे हीरक माणिक मोती
किती क्षुद्रता त्यांची इथल्या
धारदार पोलादापुढती !

कपाटांत ह्या झगमगणाऱ्या
परोपरीच्या सुऱ्या कातऱ्या
आणि त्यांचिया तीक्ष्णपणाला
साथ देतसे उग्र दर्प, जो
खोलीमधिं ह्या गच्च कोंदला.

मेजावरचा आरसपानी
प्लॅस्टिकचा सरपोस मुलायम
तरीहि दिसती काय न त्यावर

गळलेले रक्ताचे ओघळ ?
अखेरच्या तैशाच घरघरी,
—आणि तयांतुन अखेरचे जे
कुणीकुणी घेतले जगाचे
निरोप, तेही दिसती मुद्रित !

नवल नव्हे का—खोलीमधिं या
प्रवेशितो जो, स्वयेंचि शिरतो
गुहेंत काय न कृतान्ताचिया ?
आणि पहुडतो जो मेजावर
कां न चढतसे आपण होऊन
मांडीवर मृत्युच्याच ?

—आणि पहा पतकरतो शरणागति
ह्या शस्त्रांनीं करून घ्याया
निज विच्छेदन !—
विशेष हें कीं
पुन्हा जगीं या जगावयाची आशा ठेवुन !

समरांगण—मृत्युचेंच अंगण
तरीहि झुंजायास धांवती
रणीं ज्यापरी रथी महारथि
बचावुनी यावयास परतुन.
तेविं येतसे मानव येथें—मरणद्वारीं—
आशा घेउन जगावयाची पुन्हा भूवरी

काळावरती मात कराया शूर सज्ज जे
त्यांच्यासाठीं सिद्ध इथें हें शस्त्रागारचि
आणि जयाला जगावयाचें
तयाचीच चिरफाड करावी इथें लागते.

मृत्यु नव्हे यम कुणी निराळा
महिषावरूनी वावरणारा.
ज्याच्या त्याच्या उरीं नि पोटीं
तो बसलेला दबा धरुनिया.
निपटुनि हुसकावतां तयाला
जीवदान मिळतसे जिवाला.

जो चढतो ह्या मेजावर
सत्यवान तो ठरतो केवळ
तीक्ष्णशस्त्रमति सावित्रीच्या चातुर्यानें.

मेज इथें हें – असे आखली
सीमा-रेषा इहपर लोकांमधली.

१९-१-६०

२८

## ही माझी कविता जुनी

ही माझी कविता जुनी
पुन्हां वाचुनी
पाहतां सहज
तें डुलं लागतें झडलेलें अंबुज.

ओलांडुनि आलों जगें
आणि जीं युगें
लोपलीं पार
करुं त्यांत लागतों अकस्मात् संचार

ज्या हारपल्या संपदा
आणि आपदा
फिरुन त्या प्रगट
होऊन, मजसवें करूं लागती लगट

कीं टोपण उडतां क्षणीं
बाटलींतुनी
फेस उसळून
त्यांतुनी भुतावळ मांडितसे थैमान

उत्खननांतुनि ज्यापरी
येतसे वरी
नष्ट इतिहास
मजपुढें तेंवि माझेच येति अवशेष

ही माझी कविता जुनी
पुन्हां वाचुनी
पाहतां सहज
यापरी भावुनी, कळकळतें काळिज

२८-१-६०

२९

## मंत्राक्षता

" माझा महाराष्ट्र, मी हा मराठी "
अशा घोषणांनीं पुरें, गोपुरें—
गेलीं निनादून. उंडारलीं तेंवि
ह्या घोषणांनीं शिवारीं गुरें.
लाटा-करीं फेनमाला धरोनी
उभा सिंधु हा ज्याचिया स्वागता
त्या पर्वकालाचिया पूजनीं मी
समर्पूं सजे आज मंत्राक्षता.

" माझा महाराष्ट्र होईल संपन्न
सामर्थ्यशाली कसा, केधवां ? "
प्रत्येक ही हालचालींत माझ्या
स्फुरावी सदा दाटलेली हवा
" मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी "
असा विक्रमा ध्यास माझ्या हवा
ग्लानीमधें तेंवि झोपेमधेंही
असा श्वास-उच्छ्वास माझा हवा.

" मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी "
अहो, एक ह्या तालटेक्यावर
लागे जरी वावराया शिवारीं
विळा, कोयता, मोट वा ट्रॅक्टर

तेथें नफा आणि तोटा कुणाचा ?
कुणाचा धनी कोण वा चाकर ?
चालावयाच्या न तेथें कुऱ्हाडी
कधींही कुणाच्याहि मानेवर.

" मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी "
छिनीनेंच ह्या हो घडावा चिरा
ऐसा चिरा कोहिनूराहुनी त्या
ठरावा न का दिव्यदीप्ती हिरा
" मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी "
गिलावा जरी हा घरां मंदिरां
तेथें पहारा न लागेल कोणा,
कधींही न फावेल त्या तस्करा.

" मी हा मराठी " उरीं रोमरंध्रीं
असा दाटतां गाढ माझेपणा
कां व्हायचे ना लुळे हात ते हो
उगारून येतील जे जे घणा
" माझा महाराष्ट्र, मी हा मराठी "
जरी प्रेमपान्हा उरीं पाझरे
वैराग्निचे जातिजातींतल्या का
फुलावेत तेथें निखारे बरे ?

" मी हा मराठी, महाराष्ट्र-धर्मी "
असो हाच ताईत गंडा गळां
यज्ञोपवीताचिया धारणाचा
घडो ह्या न मंत्राविना सोहळा

एकात्मतेला तडे जावयाची
        कुणालाहि यावी न शंका कधीं
ह्या धोरणानें प्रवर्तेल जो तो,
        विवंचून वागेल मंत्री सुधी.

" आम्ही मराठी, महाराष्ट्रधर्मी "
        असा घोष येतांच कानांवरी
जो संभ्रमीं, संकटीं, कर्दमीं, त्या
        नवा धैर्य-संचार व्हावा उरीं
" आम्ही मराठी, महाराष्ट्रधर्मी "
        पताका अशी ब्रीदमुद्रांकिता
देखोन वाटेल दैत्यां दरारा,
        महन्मंगला तारिणी भारता.

१३-३-६०

३०

# उंच चढा! उंच चढा!

उंच चढा, उंच चढा, अधिकाधिक उंच चढा
पायामधिं पडलेला झटकुनि जंजाळ-तिडा
हाच धडा सह्याचा एक एक देइ कडा
ह्याच धरा ध्येयाचा ध्वज समोर नित्य खडा

चढतांना उंचावर पायऱ्या हव्यात जरी
कधिंही नच देउं पाय इतरांच्या माथ्यावरि
क्षुद्रतेस किल्मिषास दापुनिया पायतळीं
उंचवूं स्वतास अम्ही—अमुचे आम्हीच बळी.

न्यायाची ढाल उरीं, शीलाचा पोत करीं
क्षेमाचा सकळांच्या आचराल धर्म जरी
शस्त्रांविण शत्रूंचा होइल हो नायनाट
प्रेमाचा दरवळेल दाहि दिशां घमघमाट

वाट असो काटेरी, रात्र असो अंधारी
वावरोत मारेकरि हिंस्रपशू कान्तारीं
विरघळुनी होतिल ते स्नेहाळू कैवारी
हीच तपःसिद्ध हवी नजरेमधिं जादुगिरी

उंच होउं बुद्धिवंत, उंच होउं शौर्यवंत
ऐसे कीं वाटावी नच कुणास भीति खंत
"ह्या उच्चस्थांचा हो नित्य असो वरदहस्त"
हीच अपेक्षा करोत जे सभोंवतीं समस्त.



क. ५

जगणारे येथिल ते हिंपुटी कधीं नसोत
मरणारे मरतांना तृप्तकामना असोत
जीवनांत कर्तव्यासम उत्सव नच दुसरा
वाटावा प्रत्येका येणारा दिन दसरा

राज्यमंडळांत महाराष्ट्र असो दीप्तभाल
ऐशा स्वर्गांत महाराष्ट्र असो सर्वकाल
ह्यास्तव हो उंच चढा अधिकाधिक उंच चढा
पडतां-झडतांहि उठा गगनमंडळास भिडा

हाच घोष घुमवी ही शुभघटि हा पर्वकाल
येइ उषा आलापित घुमवित झांजा नि टाळ

१८-४-६०

३१

# नवा महाराष्ट्र

नवा महाराष्ट्र येतसे उदया
पुकार करती चौघडे सनया
शिवनेरीवरी पाळणा फिरून
नवीन युगाचा राहे आंदोलून

गेली हेलावून आज इंद्रायणी
आज चंद्रभागा गेली मोहरुनी
कृष्णा-कोयनांचा सारा परिसर
सहस्त्रशीर्ष हा सह्य गिरिवर
मावेना तयाचा पोटांत आनंद
थबथबे त्यानें जांब करवंद

चाफळचा राम बह्याचा मारुती
खंडोबा जोतीबा यमाई गोमटी
तिष्ठला विठ्ठल चंद्रभागा-तटीं
मंगल पाहाया काय हीच घटी
सज्जनगडींच्या समाधीमधून
घुमाया लागती बोल ते फिरून—
“ शिवरायाचा तो आठवा प्रताप
शिवरायाचा तो आठवा साक्षेप ”

◎ ◎ ◎

नवा महाराष्ट्र    येतसे उदया
येई आनंदाचें    भरतें हृदया
भरतीच्या ह्याच    लाटालाटांतून
भविष्य नेमकें    ठेवा निरखून

लाटांच्या ललाटीं    फेस-मुंडावळ्या
नक्षत्रांच्या लडी    जणूं लगडल्या
तैशाच सदाच    कपाळीं आपुल्या
पाहिजेत माळा    मोत्यांच्या शोभल्या

सागराच्या लाटा    थयथयतात
कोटी कोटी काय    पालवी तो हात
गर्जे " अविश्रान्त    हात राबती जे
अन्तःपुरीं लक्ष्मी    त्यांच्याच विराजे "

◎ ◎ ◎

आज महाराष्ट्र    संभवे नवीन
गतकाळावर    नको गुजराण
नवीन चैतन्य    नसानसांतून
कारंजासारखें    यावें उफाळून

नवीन करूं या    मनांत संकल्प
नको एकमेकां–    विषयीं विकल्प
पुरातन जीं जीं    भुतें मानगुटीं
देऊन टाकूं त्या    त्वरें मूठमाती
भट्टींतून जैसें    निघतें सुवर्ण
तैसाच घडावा    आज पुनर्जन्म

नकोत इमले हवेंतले उगा
नको नाचविणें मनोरथ-फुगा
बोलून बोलून संपण्यापरिस
कृतीनें संपादूं कर्तृत्व-परिस
बुद्धीचा परिस स्फूर्तीचा परिस
लावूं महाराष्ट्रीं कडेकपारीस
हिऱ्यांमोत्यांहून मौल्यवान खाणी
फैलावतील हो कोनाकोनांतुनी
किमया करून दाखवूं आगळी
होईल ही काळी द्रौपदीची थाळी
हनुमंत-भक्ति आमुचिया कुळीं
द्रोणाद्रि लीलया तोलूं करतळीं

भवितव्य भव्य घडवूं उज्ज्वल
कृतार्थ होतील अजंठा वेरूळ

१९-४-६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ...32249 वि: का
क्रमांक ...1.44.4.5... नों: दि: 19।

३२

# शाप

उत्साहावर पडेल विरजण ऐसें कांहीं होउं नये
म्हणतों आपण, परंतु अपुल्या हातीं आहे काय सये

मोहर येतो उदंड, त्यांतुन एकाद्याची बाठ घडे
आम्रतरूच्या तळीं बाकिचा गळून सगळा सडा पडे

बाठहि कां ती पक्व दशेला जाइल याचा नेम कुठें ?
दगड मारुनी पाडतील ती अवचित रस्त्यांतिल भुरटे

हेच अनुभवा काय न आलें सये आपणां संसारीं ?
नियती नोहे बटीक अपुली मनासारखें करणारी.

उचंबळोनी येते पोटीं बोलुनि जातों तेंच जरी
बोल आपुले झडून अवघ्या जाणाऱ्या मोहरापरी

बोल आपुले कां स्वातीचे थेंब ? आणि ते जरि असले
झेलुनि ध्याया तयां शिंपले नकोत कां ते आसुसले ?

बोल आपले टिपले जातिल फार फार तर फितीवरी-
यंत्रांतिल ह्या ऐकवा त्रया ज्याचे त्याला माघारीं

मिळे न मौक्तिक ! फक्त मिळावा कां ऐकाया प्रतिध्वनी ?
प्रतिध्वनी तो — जणुं दावितसे वेडावुनि आपणां कुणी.

अपेक्षिल्यापरि घडेचि ना ! परि खेद न म्हणुनी मदंतरा.
उत्साहावर विरजण पडणें हाच गमे परि शाप खरा.

१०-४-६०

३३

# सयांनो, लावूं पणत्या

सयांनो, लावूं पणत्या
पहिल्या दिवाळीला
इडापिडा टळायला
महाराष्ट्रीं

पहिली माझी पणती
शिखर-शिंगणापुरीं
शंभुकृपा-छत्र शिरीं
सदा राहो

दुसरी माझी पण
दुजा नाहीं ठावा नेम
वाढो महाराष्ट्र-धर्म
भारतांत

तिसरी माझी पणती
तिन्ही त्रिकाळीं झडावा
महाराष्ट्राचा पोवाडा
इतिहासीं

चवथी माझी पणती
साध्य चारी पुरुषार्थ
महाराष्ट्रीं ह्या होवोत
चतुर्वर्णा

पांचवी माझी पणती
पंचप्राण तेवावेत
महाराष्ट्र-उत्कर्षार्थ
प्रत्येकाचे

सहावी माझी पणती
सहा शास्त्रें, सर्व कला
याव्या भरभराटीला
महाराष्ट्रीं

सातवी माझी पणती
मंथुनिया सिंधु सात
लक्ष्मीपूजन यथार्थ
करूं चला

आठवी माझी पणती
अष्ट सिद्धिविनायकां !
शुभ बुद्धि सकळिकां
द्यावी राया

नववी माझी पणती
महाराष्ट्र-दरबारांत
तेजोगुणी झळाळोत
नव रत्नें

दहावी माझी पणती
उजळती दिशा दाही
थारा नैराश्याला नाहीं
नवोद्योगीं

१८-९-६०

३४

# मी

चुकवून रोजची वर्दळ वा रहदारी
मी गांव सोडुनी आलों दूर शिवारीं
शुकशुकाट होता माळ ! तोंच मजपुढती
ठाकली आकृती,–परिचित गमली पुरती.

आकृती ?–नव्हे, तो होतों साक्षात् मीच
त्या ऐन उमेदीमधला इंच–नि–इंच
पालाण जगाला घालाया सजलेला.
गगनास भिडाया गरुडपंख असलेला.
चमकत्या विजेची प्रत्यंचा ताणून
स्फूर्तिचे तिच्यावर तीर सज्ज चढवून
कमठ्यास्तव वळवुन कल्पलतेची फांदी
मी झणत्कारिली जेव्हां पहिली नांदी.
बेफिकीरपण तें तुडुंबलेलें नेत्रीं
लेखिली जेधवां वेत्रवतीच धरित्री.

तो एककाळचा मीच पुढें साकार.
अन् सन्मुख मी हा सांप्रतचा अवतारः—
कांचेपरि ज्याच्या डोळयांमधलीं बुबुळें
निखळती पोपडे पंख तसे गळलेले
खाउनी सारख्या पराभूतिच्या थपडा
विच्छिन्न शिडाचा झाला ज्याच्या कपडा

नैराश्य-लंगरें तमांत रुतुनी पाय
विसरला पार जो हसणें म्हणजे काय.

हा आज असा मी, टाळुनिया रहदारी,
तो गांव सोडुनी आलों दूर शिवारीं.
तों एककाळचा मीच माझियापुढतीं-
पाहतां, दचकलों निर्जन माळावरती.
एकान्त इथेंही निवान्त गवसेनाच
माझेंच भूत मजपुढें करी हें नाच.

◎ ◎ ◎

तो भूत-काळ,-त्याकडे फिरवुनी पाठ
मी गांवाकडली लगबग धरिली वाट
तों आडविलें मज हांसत क्वचित कोणी
अभिवादन केलें मीहि तया हांसोनी.
ती दुसरी तिसरी नव्हती कोणी व्यक्ति
"जो झालों असतों मी" तो होतों पुढतीं
त्याचिया गळां स्वप्नांच्या साऱ्या माळा
अन् यशस्वितेचा मुखीं तजेला दिसला
शिरपेंच मंदिलीं झगमगला श्रेयांचा
मी करीत आलों पाठलाग हो ज्यांचा.

"जो झालों असतों मी" तो वास्तव नसता
ही भेट घडावी? कीं हा भासचि नुसता?
ह्यापरी उसळतां आश्चर्याची लाट
क्षणिं सर्व मोकळी दिसली पुढची वाट.

◎ ◎ ◎

जरि वाटेमधला भास जाहला दूर
उचलवे न पाउल, मनांत झालों चूर.

" जो होतों " आणिक " झालों असतों जो मी "
ते दोघे दिसले हासत मजला व्योमीं.
ते होते नंदनवनामधें रममाण
नरकांत इथें मम रुतले होते चरण.
कां असावेत ते करीत माझी कींव ?
कल्पनेसवें ह्या मनांत भरलें हींव
चुकवाया त्यांच्या नजरा माझ्यावरल्या
हुडहुडींतही त्या पळत सुटावें तसल्या
वाटलें; परंतू पडलों ठेंचकळून.
हुडहुडीऐवजीं उलट तप्त होऊन
मी तयां म्हणालों " हसा, हसा, मजलागीं !
पण, मजला म्हणजे हसतां कोणालागीं ?
रे हसणाऱ्यांनो,-तुम्हीच, ते माझ्यांत
लागुनी झळा, संसृतिच्या हे उरलात "

" रे हसणाऱ्यांनो, तुम्ही वायकी नुसते !
त्या तुम्हांतला मी धक्के आणि चपेटे
खात-खात आलों आजवरी दिनरात
माझिया स्वरूपीं तुम्हीच हे उरलात.
ह्यामुळेंच माझा आज असा अवतार
मज हसावयाचा काय तुम्हां अधिकार ?
उकळत्या काहिलींतुनी न निघती तळुन
निघती न तापल्या तव्यावरुनि भाजून
जे अलिप्त असती सुखासीन अवदार
मज हसावयाचा तयांस का अधिकार ?

रे हसणाऱ्यांनो, आणि सांगतों ऐका
जरि कितीहि सुंदर रंग रूप अन् रेखा

मिरवल्यात अपुल्या तुम्ही माझियापुढतीं
वायवी मूर्तिहुनि सत्य पावते महती.
मी असेन कळकट, हतबल आणि अपेशी
परि करणें त्याची कशास खंत मनाशीं ?
हें स्वरूप कळकट, हतबल आणि अपेशी
ऐसेंच निरंतर राहिल काय भविष्यीं ?
हें स्वरूप म्हणजे पुटेंच हीं वरवरचीं
निखळुनी पुटें हीं कधीं तरी जायाचीं
निर्लेप त्यांतुनी रूप निखालस मग जें
संभवेल तें तळपेल आगळ्या तेजें
आजच्यांतुनी जो ऐसा होइन प्रगट
त्यापुढें तुम्हां लागेल व्हावया विनत ''

२७–५–६०

३५

# सिंधू आणि ब्रम्हपुत्रा

माझ्या येउनि पाठिशीं, घुसळुनी, खांद्यावरी वाकुनी
माझी ओढुनि घेउनी हनु तुवां गालीं दिलें चुंबन
'आला नाहिं न राग ?' आणि वरती कानीं असें बोलुन
माझ्या सन्मुख पातलीस, नयनीं प्रेमोत्सवा दावित.

" आलों चिंतित जें कितीक वरुषांपासून तें हेंच कीं.
यावा राग तरी किमर्थ ? सखये ! " ऐसें दिलें उत्तर.
होत्या ज्या जपल्या स्मृती उजळल्या ओघांत संभाषणीं
आलें आणि उचंबळून हृदयीं.—तों भंगलें स्वप्न तें !

हें मी काय असें कसें बघितलें स्वप्नीं क्षणापूर्विंच्या ?
कालौघांतुनि ती नि मी कितितरी आहोंत दूरावलों !
होतों सन्निध तेधवांहि नव्हती जाणीव ऐशी कधीं
व्हावें हृद्गत आमुचें प्रगट कां स्वप्नांत हें कोठलें ?

होतें आजवरी धुकेंच भरलें कां जीवितीं वास्तव ?
गेलें तें वितळून पार म्हणुं कां स्वप्नांतल्या भेटिनें ?
स्वप्नानें असल्या तिलाहि तिकडे माझी अशी ओळख
होवोनी, बनली असेल हृदयीं ऐशीच कां व्याकुळ ?

आतां कोठुनि प्रीतिसंगम परी होणार ह्या जीवितीं ?
सिंधूचा जगतांत लाभ न कधीं त्या ब्रह्मपुत्रेप्रती

१२-६-६०

३६

# ढलपी

अंगधुण्याची करुनि तयारी
मागिलदारीं चुलीपुढें तूं
सारुन ढलप्या आणि काटक्या
होतिस पाणी तापवीत, तों
        उभा राहिलों तुझ्या पाठिशीं

रोजच चाले माझी ये–जा
        तुझ्या घरांतुन पुढ्न मागुन
' वेळ-अवेळ ' न विचार शंका
        घरोब्यांतल्या मुलांमुलांतुन

मीच उभा पाठीशीं तुझिया
        सहजचि तुजला कळलें होतें
अंगधुण्याच्या वेशाचें त्या
        इतुकें कांहीं वाटत नव्हतें
असेंच होतें अपुलें नातें
        असें निरागसपण तव होतें

चुलींत होत्या पेटत ढलप्या
तांबुस त्यांचा उजेड तुझिया
लहरुं लागला गालीं तिरप्या

कमलदलापरि मुळांत ज्यांची
माहित मजला ठेवण शोभा

तोंच अचानक जवळ सरकुनी
पाठीमागुन, दों हातांमधिं
कानशिलें तव घेउनि अलगद
त्वरित उचलिलें तव मुखमंडल
बघुनि पसरली तांबुस कांती
भाळापासुन हनुपावेतों
ढलपीसम पेटल्या मनानें
लवुन घेतलें झरकन चुंबन.

काय अकल्पित अवचित ऐसें
निमिषार्धामधिं गेलें होउन !
अपुल्यामधल्या रूढ नीतिला
तेंवि कितीतरि निषिद्धही पण !
गैर तथापि न तें तुज गमलें
खुळें पोरकट माझें वर्तन
' मलाहि अभिमत हेंच ' असें जणुं
तुझे बोलले टपोर लोचन.
प्राजक्ताच्या आणि फुलांची
मागिलदारीं झाली पखरण.

◎ ◎ ◎

पारिजात तो अजून आहे
मागिलदारीं करीत पखरण
अजून असते कुणी कुणी त्या
चुलींत सारित ढलप्या सर्पण

परंतु लालस मुखमंडल तें
कधींच अस्तंगत जगतांतुन
ढलपीसम माझिया मनाला
मात्र अखंडित पेटत ठेवुन

२१-६-६०

३७

# मुंग्या ! पंखांच्या मुंग्या ! !

ह्या मुंग्या !—
वावरती घरभर
परसांतिल रोपांवर
सरसरती खालीं वर
भिरभिरती अंगणभर
अन्नाचे कण
शोधायास्तव
सारी वणवण !

खरपुस तापुन दूध निवालें
तोंच तिथें त्या सायीभंवतीं
दिसेल ह्यांचें पडलें आळें !
थेंब मधाचा किंवा भाकर
कसल्याही त्या असो स्वरूपीं कुठेंहि साखर
ह्या मुंग्यांचा तेथें वावर.
स्वतांस गणती खास रसिकवर !

क्वचित् तयांप्रति पंखहि फुटती
ते नखुल्याच्या शतांश असती
तथापि घेती करुनि भावना
कीं ‘ विहगाची अमुची कोटी ’



क. ६

“ गरुडपंक्तिचे मानकरी
झालों आम्ही पहा तरी ”
उडूं पाहती ह्या तालावर.
बुजबुजलें हें स्वयंपाकघर.

ह्या पंखांच्या मुंग्या !
पंखहि त्यांचे क्षणभंगुर किति
बघतां-बघतां टपटप गळती
रसिकजनांची अंगत-पंगत
विरस तिचा परि पुरता करती !

३-७-६०

३८

# मेल्यानें होत आहे रे

बरें झालें, तुवां केली आत्महत्त्या
दिसतें ना सत्य चितावन्हीविना.
अग्निदिव्य करी शुद्धशीला सीता.
सर्वसाक्षी जिथें होतात आंधळे
तिथें चार-चक्षू...ते तर वेंधळे !
दूध प्याया तयां लागतें बोंडलें !

◎ ◎ ◎

बरें झालें, तुवां केली आत्महत्त्या !
गुणाः पूजास्थानम्
गुणिषु न च लिङ्गम् न च वयः
सुभाषितें ऐशीं कवळून उरीं
गुणांची केलीस संपादणी जरी
त्यांची कधीं तरी कदर होईल ?
– खुळा रे खुळा तूं ! —आशा ही निष्फळ.
साहित्यलक्ष्मीच्या वरातीपुढतीं
नक्षत्रमाळाच सुभाषितें होतीं.
नक्षत्रमाळा त्या बेगडी नुसत्या
भवसंग्रामांत निकामी पुरल्या.
घेउनी पोटींशी सुभाषितांची त्यां
भरली घागर

पोहून जायातें येई का भयाण
जीवित-सागर ?

◎ ◎ ◎

हवी होती तुला वेतनीं बढती ?
किती कोती तुझी दृष्टी ही जीवितीं !
बरी सुचली ही तरी आत्महत्त्या !
इहलोकांतून
जासी परलोका
हीच खरीखुरी नव्हे का बढती ?—
कोणीही तुजला जेथून खालती
ओढुं ना शकती !

◎ ◎ ◎

बरें झालें, तुवां केली आत्महत्त्या.
जगून तुजला जमलें जें नाहीं
कुटुंब-पोषण
तरतूद त्यांची छान तुझ्या गेहीं
जातां तूं मरून !
मरणांत खरोखर जग जगतें !

◎ ◎ ◎

बरें झालें, तुवां केली आत्महत्त्या.
सुवर्ण-मुद्रांच्या मिळतील राशी
‘ शहानामा ’ रची म्हणून फिर्दोसी
परंतु पडले पदरीं रुपये !
परतला गांवीं भंगल्या हृदयें !
आणि एक दिनीं त्याची शव-पेटी
होती वेशींतून पडत बाहेरी

हाय, त्याच वेळीं—
सुवर्ण-मुद्रांच्या गोणी लादलेल्या
उंटांचा काफिला
बेचैन शहानें भरपाईपायीं
धाडून दिलेला
शिरत होता त्याच वेशींतून
पुसत पुसत कवीचें मकाण.
दैवाची तऱ्हाच मोठी उफराटी !
जो तो श्रेयासाठीं
फुटे उरीं-पोटीं
परि श्रेय भेटे
स्मशानाच्या वाटें

◎ ◎ ◎

बरें झालें, तुवां केली आत्महत्त्या.
म्हणू ' प्राणान्तिक केलें उपोषण '
[ नवीन युगाचें नवें तत्त्वज्ञान.
नव्या तत्त्वज्ञाना नवें अभिधान.
पण चित्रगुप्त
एक कारकून
एव्हढी अक्कल तयाला कोठून ?
' हीहि आत्महत्त्या ' ठेवी तो लिहून ]
वांछिलें जें तुवां होतें कां विवाद्य ?
परि तें समूर्त व्हावयास साध्य
पुरा न पडला नुसता आक्रोश.
शास्त्र्यांच्या मानसीं पडाया प्रकाश
अस्थींचाच जेव्हां पेटविसी टेंभा
आली खरी जाग तेव्हां महाभागां

सत्य प्रस्थापाया
करावा लागतो
प्राणपरित्यागाइतुका हा त्रागा !

म्हणती सुबुद्ध :—
" आत्महत्त्या शुद्ध
उतावीळपणा !
आततायीपणा ! "
हालतें न ज्यांच्या पोटांतलें पाणी
काय त्यांचें वेंचे बोलतां ही वाणी ?
सुखासीनांचा तो अहो संथपणा
संत्रस्तांना होतो किति जीवघेणा.
हीहि सुखासीनां
यावया कल्पना
बरें झालें, तुवां केली आत्महत्त्या.

मेल्यानें होत आहे रे
आधीं मेलेंचि पाहिजे !

८–९–६०

३९

# उभारा

आभाळ फाटतां तयास घालूं टाके
भूगोल भंगतां भरूं फटीमधिं लांबी
कोसळतां तारे ( फुलें नि सागरगोटे
झेलतों ज्यापरी तसे ) झेलुनी घेऊं
गुंफून तयांचे तुरे मस्तकीं खोवूं
अन् करूं साजरी ऐशी विजयादशमी.

आटवी सागरा टिटवी पेटुनि हट्टा
ही नव्हेच कविकल्पना नव्हे वा थट्टा
ऋषि अगस्तिच्या वंशजांचिया देशांत
ते सात समुद्रहि कुडचाभर ठरतात.

सोंगटी उचलुनी ठेविति इकडुन तिकडे
तैसेच बापुडे अजस्र डोंगर हलवूं.
कावळा उचलतो द्रोण जसा पळसाचा
अंजनी-सुतानें तेंवि लीलया अद्रि
घेतला उचलुनी. —कथा विसरला काय ?
करुं भीमबळानें कां न अचाट उपाय ?

तीं काय पुराणें म्हणतां भाकड गोष्टी ?
मानवा येतसे निर्माया प्रतिसृष्टी —
फुरफुरते दिवटी, तशी अंतरीं ज्योत
नव चैतन्याची घेत राहतां पेट.

जीं महान गूढें निसर्गांत भरलेलीं
आव्हान देत जीं पुढें ठाकलीं दिसतीं
विज्ञान-बलें तीं उकलूं येतिल सहजीं
ज्यापरी येतसे खिसा कराया उपडा.

ब्रह्मशीर किंवा ऐषिक अस्त्रें दिव्य
हीं नव्हतीं नांवें खोटीनाटीं नुसतीं
तसलींच कितीतरि जगड्व्याळ अत्युग्र
आजला घालती जगामधीं थैमान.

दुर्दम्य पाहिजे उरीं आत्मविश्वास
पाहिजे कराया प्रयास आटोकाट
गमतील अंबरांतलीं तरी नक्षत्रें
भिजवून सोलल्या वालाच्या डाळिंब्या.

कर्तृत्वबलानें श्रेय आणि जें प्रेय
तुज आणायाचें संपादुनि रे मनुजा
तरि शिलंगणास्तव 'विजयादशमी' दिवस
हा एकच केवळ मुहूर्त मानुं नकोस.
उड्डाण घ्यावया होता मन उत्स्फूर्त
नलगेच पहाया संगल अन्य मुहूर्त
आकाश-अंत ना कळुन अंतरिक्षांत
झेपावति पक्षी पाहुन काय मुहूर्त ?

जर असेल कांहीं बघणें, हेंच पहा कीं
आपणा व्हायचें 'नारायण' या लोकीं.
भोगणें ज्यामुळें दाह मानवालागीं
त्या निववायातें येतिल कैशा आगी
हें एकच सर्वोद्योगीं अंतःसूत्र
राहिलें पाहिजे. –विसरूं नको क्षणमात्र

१४–९–६०.

४०

# या हो योगेश्वरा

जयंतीच्या पुण्यदिनीं हातीं घेतां वृत्तपत्र
महात्म्याचें प्रेषिताचें दिसे पुढें छायाचित्र
आजूबाजूला परंतु गच्च भरले रकाने
राष्ट्रधुरीणांचीं ज्यांत एकमेकास आव्हानें
तरी विश्वशान्तीसाठीं ह्यांनीं मांडियलें ठाण !
मात्र खिशांत ब्रह्माण्डा जाळणारे अग्निबाण ! !
कुरुक्षेत्रीं धर्मक्षेत्रीं जैसे कौरव पाण्डव
शंखनादें नाचविती गदा तूणीर गांडीव.

झाला संहार केव्हढा कुरुक्षेत्रीं धर्मक्षेत्रीं
अस्त्रांचिया प्रक्षेपणीं जळूं लागली धरित्री
पांडवांच्या निःपाताला झाला अश्वत्थामा सिद्ध
युद्धनीति विसरला उग्रकर्मा तो प्रक्षुब्ध
रक्षा कराया सैन्याची सोडी अस्त्र ‘ नारायण ’
पांडवांना नाटोपे तें, उडे रणीं दाणादाण.
तोंच ठाकला पुढतीं योगेश्वर चक्रपाणी
सांगे “ हातांतलीं शस्त्रें सैनिकांनो, टाका झणीं.
निर्वाणीच्या ह्या समयीं व्हावें सर्वांनीं निःशस्त्र
हाच उपाय व्हावया निस्तेज हें उग्र अस्त्र ”

महाभारतीं दिलेला योगेश्वरानें संदेश
विसरले पुढले ते युगधुरीण पुरुष
तुम्ही महात्माजी ! पुन्हां हीच फिरविली द्वाही
परतंत्र भारताला दिली स्वातंत्र्याची ग्वाही
झाला भारत स्वतंत्र; परि तुमचा तो मंत्र
या हो योगेश्वर, सांगा पंचखंडांत सर्वत्र.

जबड्यांत अग्न्यस्त्रांच्या सांपडली मानवता
शाप ठरे शास्त्या-हातीं शोधकांची बुद्धिमत्ता
शस्त्रसंन्यास शास्त्यांना कसा कोणी शिकवावा
विश्ववर्चस्वाकारणें जरी चाले स्पर्धा दावा
महाप्रळयामाजीं या तुमचें तें तत्त्वज्ञान
नवविश्वनिर्मितीला वटपत्र होय सान.

१९-९-६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 32249 वि: काव्य
क्रमांक 15565 नों दि. 15।6।0
9698



# अजुनि वाटतें—

अजुनि वाटतें पारंब्यांना
झोंबुनिया घ्यावे झोके
ज्या उच्छृंखलपणांतले कधिं
मनास शिवले नच धोके
जीव घाबरा तुझा करावा
परि त्या अवखळ क्रीडांनीं
घ्यावा वारा भरुनि मनाच्या—
शिडांत, जातां तूं भिउनि.

लगाम–खोगिर न घालतांही
फक्त म्हटाळी धरुनि करीं
तट्टु पिटाळुनि, शेताकडुनी–
येतां मारुनिया फेरी
तूं खांद्यावर पिले, डोइवर
घागर — येतां पुढुनि अशी
तारांबळ तव उडवाया, मज
बोलावितसे पांद पिशी

तांबदरडिच्या डोहामाजीं
उड्या घ्यावया मन धावे
तनु रेंगाळत बसो, तियेचें
तोडुनि टाकावें दावें
डुंबडुंबुनी उडवावें जळ
धुणं धूत तूं असतांना
अहेर मिळवाया तव मुखिंचा—
" पुरे किं रे, हा धिंगाणा ! "

बांधावरती गुरें चारतां
चघळत गुळचिट बाटुक तूं
धांव तुजकडे घ्यावी, टुकटुक
करुनी हिणवित असतां तूं
पळतां पकडुनि पदर तुझा अन्
हिसकुन हातुन तें घ्यावें
आणि वाटतें अजुनि पुन्हां तें
अर्धेलीनें चाखावें.

वाळवंट धुंडुनी वाटतें
शंख—शिंपले जमवावे
नजराण्यास्तव ढीग तयांचे
तुझियापुढतीं घालावे
आणि शिवारांतुनी जमवुनी
निळीं नि पिवळीं कळ्या—फुलें
बांधुनि मुंडावळ्या पहावे
मुखमंडल तव किती खुले

अजुनि वाटतें किती किती तें
दाटी त्याची होइ उरीं
पायबंद तोडुनी 'आज'चे,
मानस धावे भिरीभिरी
काळसागरा-तळीं बुडाल्या
आणिक ज्या रम्या नगरी
तयांतुनी हिंडतां गुदमरे
अडकुनि मी अभिमन्युपरी

११-१२-६०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 12476

४२

## मावळतीला

सूर्यानें गाठला अस्ताचल
हळूहळू मागें रंगलें आभाळ
वैतागानें जणुं कुणी चितान्यानें
लिडबिडलेले
फेकूनिया दिले
आपुले कुंचले
आणि चिडून
दिले लाथाडून
लाल शेंदरी रंगांचे रांजण
वाहतात त्यांचे अस्ताव्यस्त पाट.
त्यांत लांबच लांब
मेघाची पोलादी कांब
आडवी पडली.
किंवा ही सुसर सुस्तावलेली
किंवा अग्निबाण अणकुचीदार
जाहला आडवा —
जयाला ज्वाळांचे फिस्कारले पंख.

धगधगतें ऐसें एक चित्र
किती भयाण, किती विचित्र
येत येत आलें आकारा तेथ.

हळूहळू परि
        दाटाया लागल्या काजळी छाया
हळूहळू परि
        मिटाया लागली रंगांची किमया
आणि हळूहळू
        विझाया लागली ज्वाळांची दुनिया.

आणि वाढत्या वाढत्या अंधारीं
विटक्या मळक्या पटकुरापरि
        विरत चालला चित्रपट सारा
तोंच कांहींसा वरच्या बाजूला
झगमगता झळकूं लागला
        प्रशान्त सोज्वल शुक्राचा तारा

९-१२-६०

४३

# पायदळीं पाचोळा

चुकलों मी ! चुकलों मी ! मन आंतुन देइ दुशी
पतकरल्या मार्गावर पडल्यावर तोंडघशीं

पतकरला मार्ग ? नव्हे, वाहवलों वाऱ्यावर
वाऱ्याच्या लहरीवर पाचोळ्यापरि भिरभिर

कधिं शिखरीं, कधिं कुहरीं; स्वेच्छया न कांहिं मुळीं
तो पडतां थंड, हाय ! पडणें मग पायदळीं

पायदळीं चुरगळतां पाचोळा करि चुरचुर
ती चुरचुर—पतिताची ती चिरचिर, ती कुरकुर !

निज तंत्रें जाहलें न ज्याचें संचलन-वलन
तो जिवंत असतांना जगला नच काय मरण ?

चुरगळतां पाचोळा, मेलेला परत मरे !
तरि त्याची ती कुरकुर काय कुणा होय बरें ?

निज तंत्रें चालतसे ज्याचें रुधिराभिसरण
जो झंझावातांतहि राहि उभा पद रोवुन

तो पडला तरि पडतो वृक्षापरि उन्मळून
पडतांना कडकडतो; करतो नच आक्रंदन.

" चुकलों मी, चुकलों मी " हा नसतो त्यांत सूर
तो पडतो, कोसळतो समरांगणिं जेंवि शूर.

कोसळल्या वृक्षास्तव होउनिया शोकाकुल
पक्ष्यांचे कैक थवे करिती किति कोलाहल

कोण करी चुरगळल्या पाचोळ्यास्तव हळहळ ?
मूढ मना, व्यर्थ तुझी 'चुकलों मी' ही मळमळ

२४-३-६१

४४

## जाणवला न उन्हाळा—

मी झालों होतों इतुका कीं बेजार
मीं मनांत केला स्वताचाच धिःकार—
‘ कां उन्हाळ्यांत हा प्रवास पतकरला मी ?
राहिलों न तरि का निज धामीं आरामीं ? ’

धडधडत येउनी तोंच थांबली गाडी
तीं गजबजलेलीं जिच्यांत सर्व खुराडीं
परि घुसलों त्यांतच बघुनि जराशी जागा
ना जुमानुनी आंतल्या जनांचा त्रागा

आवरासावरी करून बसल्यावरती
अन् त्रागा धुसफुस अप्सुक शमल्यावरती
सहजींच लोचनें फिरलीं अंवतींभंवतीं
तों दिसून आलें नवल अचानक पुढतीं

पौर्णिमा देखिली तेथें भर मध्यान्हीं
नच विरघळती हिममूर्ती आली दिसुनी
उघडीच करंडी आढळली संत्र्यांची
पोपटी पल्लवीं कांती खुलली ज्यांची

सळनळीत होता त्यांतच जो खंजीर
टोकास जांभळें त्याच्या दोन टपोर
खंजीर करी तो कंपन लोभसवाणें
तर जांभुळ-लहरीसवें डोलतीं भुवनें

करि उघडझांप जें संत्रें मधुनी-मधुनी
झंकार त्यांतुनी तुटक पातलें श्रवणीं
अन् किंचित् दिसल्या कुंदकळ्या विसकटल्या
परि खुलावटीला तिळही नव्हत्या मुकल्या
टवटवीत वेधक दिसला त्यांचा हार
जो वितरित होता गंधित झुळुका गार

त्या खुराड्यांत मी शिरलों होतों परका
अन् उतरेपावेतोंहि राहिलों परका
परि मार्गीं पुढतीं जाणवला न उन्हाळा
चालतां सकौतुक चिंतित नवलाईला

२८-२-६१

४५

# मिठीचा सोहळा

तुझी माझी आतां पडली हे गांठी
आतां ताटातुटी कोठली ती ?
उसळ्या मारिसी तूंच अंतर्यामीं
तूंच रोमरोमीं सिंधूपरी.
तूंच डोळियांत तूंच अवकाशीं
म्हणून दिससी भरलेला.
तूं मीं मारिल्या या मिठीचा सोहळा
केव्हढा भराला आला विश्वीं
नक्षत्रें नाचती, सिंधू आंदोळती
वसंत फुलती भोंवतालीं
तुझिया माझिया प्रीतीच्या बहरा
दिव्य हा फुलोरा नव्हे काय
अथांग चांदणें, अगाध अंधार
दुरंगी हा पूर अमृताचा
तुझिया बाहूंचा पडला विळखा
जन्म-मृत्यु-दुःखा समाप्तीच.

१-५-६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 32249 विः काव्य
४६ क्रमांक 75685 नोंः दिः 19/6/52

# ईश्वरदर्शन

मज तुझें ईश्वरा घडतें दर्शन तेथें ॥

पातल्या विपत्ती तरि न सोडितो शील
संकटीं भयानें होतसे न चलबिचल
क्षुधितास काढुनी देइ तोंडचा कवळ
तो दिसतो जेथें जेथें
मज तुझें ईश्वरा घडतें दर्शन तेथें ॥ १ ॥

धनराशि लाभल्या तरि न होतसे धुंद
जोडिल्या धनाचा सुटुं न देइ दुर्गंध
राहतो परार्थीं वेचित बुंद-नि-बुंद
तो विरळ आढळे जेथें
मज तुझें ईश्वरा घडतें दर्शन तेथें ॥ २ ॥

उत्कर्ष दुजांचा देइ जया संतोष
अपकर्षें अपुल्या आकसे न हृत्कोष
ना स्पर्श करी लव मना क्षुद्रता-दोष
संक्षेप न औदार्यातें
मज तुझें ईश्वरा घडतें दर्शन तेथें ॥ ३ ॥

गुणलवापुढें जो मान आदरें तुकवी
निज बुद्धिबळें नच अनृता नटवी पिकवी
उपवनें फुलवितों जिथें सकंटक अटवी
ते धन्य धन्य पुण्यात्मे
मज तुझें ईश्वरा घडतें दर्शन तेथें ॥ ४ ॥

लायकी न विसरे असतां सत्तास्थानीं
वेगळें न गणतो तया ऐरणीहूनी
तें राबवितो नित रमुनि लोककल्याणीं
त्या बघुनि निरासक्तातें
मज तुझें ईश्वरा साक्षात् दर्शन घडतें ॥ ५ ॥

१२–८–६१

४७

## मूक व्यथा -- १

अर्पियला नजराणा
उरलें हें तबक रितें
हाताचा स्पर्श तुझ्या
घडला परि तबकातें
चांदीच्या तबकाचें
झालें ह्यापरि सोनें
एव्हढाच हा प्रसाद !
उरलें हें शून्य जिणें

बसतों मी तबकाचें
करित अतां जरि कौतुक
क्षुधित करी भातुकेंचि
ही अपुली फसवणूक !

२१-८-६१

४८

## मूक व्यथा -- २

होते बेचैन मनीं
        येतां तव आठवणी
कालवतें उरिं पोटीं
        सन्मुख तूं दिसतां क्षणिं.
कळ उठते सर्वांगीं
        घडतां तव अंगलगी
ऐशी मी रुग्णाइत
        धन्वंतरि तूंच जगीं.

धन्वंतरि तूच जगीं
        ठाउक हें परि न तुला
बोलुनि हें दावाया
        आणि तिळहि बळ न मला.

२१-८-६१

४९

# दीपकळी ! दीपकळी !

दीपकळी ! दीपकळी !
काळोखाच्या वेलीवर लटकली सोनकळी.

गोड माझी सोनुकली
थरथर कांपसी कां ? भीती कोणी दाखविली ?

भिऊं नको माझे बाळे !
अंधारींच्या बागूलाचे पोकळ ग सारे चाळे

किति माझी धिटुकली !
बागुलाला पळतांना भुई थोडी थोडी झाली

गुणाची ग माझी बाळ !
झंकारती चांदण्यांचे तिच्या पायीं मृदु चाळ

हंसली ग खुदकन
हंसण्यानें उजळलें घरदार वृंदावन

सोनुकली ! दीपकळी !
द्युति तूंच, गीती तूंच, तूंच शुभा घरकुलीं.

२७-८-६१

५०

# आवाहन

या मुलांनो, कन्यकांनो, विक्रमा क्रीडांगणीं
झोपडी, प्रासाद — हीं या कुंपणें ओलांडुनी

अंग झाडा, घाम गाळा, यापरी बोलावते
मायभूमी पांखरांच्या सागरांच्या भाषणीं

न्हावया ताजे-तवाने मृत्तिकास्नानें करा
हिर्वळीची शेज ही देईल हो संजीवनी

मायभूमीचेंच नोहे फक्त हें आवाहन
प्रेमपान्हा दाटुनी ही हांक मारी मेदिनी

सातही सिंधूंस ओलांडून गेले पूर्वज
मंथुनी त्यांनाच झाले तेंवि लक्ष्माचे धनी

शुक्र-चंद्राचींहि येती संप्रतीं आमंत्रणें
मंगळागौरी पुजाया तारकांच्या अंगणीं

पत्रिकेमाजी ग्रहांच्या पाहणें चाली युती
द्या अडाखे पाहण्याची सोडुनी रीती जुनी

अग्निबाणाची हवी बाहूंत ऊर्मि-स्पंदनें
आणि निर्धारें नटा हो शांतता-प्रस्थापनीं

‘ एव्हढें माझें मला द्या ’ हट्ट सोडा भाबडा
‘ विश्व माझें, मी तयाचा ’ दीप हा तेवो मनीं

ब्रह्मकर्में आचरावीं हींच कीं नेमें पुढें
‘ विश्व माझें, मी तयाचा ’ अर्घ्य हा ज्यांच्यांतुनी

अंतरीं श्रद्धाबळें हा मंत्र गायत्री जपा
घ्या करीं यज्ञोपवीताकारणें सौदामिनी

‘ विश्व माझें, मी तयाचा ’ ही धरा स्कंधीं ध्वजा
व्हा विजेते जीवितीं ह्या प्रेरणेनें झुंजुनी

५-९-६१

५१

## मी आणि मी —

आहे मी एकटाच पाहुनि, कोणी माझ्यांतला
प्रगटुनी बाहेरी मजपुढें
क्रुद्ध जाहल्या दुर्वासापरि बोलाया लागला
लागला ओढाया कोरडे —

" असा कसा झालास भ्याड तूं आणिक मुखदुर्बळ ?
अरे, धडधडीत खोटेपणा
गेला मिरवित तुझियापुढुनी ऐटीमधिं तो खळ
कुणीहि न कसा काढिला फणा ? "

तोंच वाजलें दार ! लुप्त तों झाला दुर्वास कीं !
अंगिंचा सावरुनी मी चळ —
पुढें जाहलों आलेल्याच्या स्वागतास आणखी
दावुनी भाव मुखीं सोज्वळ.

तोहि परतला. पुन्हां एकटा उरलों मी पाहुनी
पुढें ये कोणी माझ्यांतुनी
म्हणे " करंट्या, खुळ्या, चांगली आलेली चालुनी
दिली कां लक्ष्मी लाथाडुनी ?

कसली घेउन बससी शुचिता ? निरिच्छता एवढी ? "
– कुणी तों करिं दारीं टकटक.
दिली तयानें त्यासरशी तों दडी आणि मी कडी –
धांवलों काढाया उत्सुक.

' यावं ! यावं ! ' उचंबळोनी म्हटलें अभ्यागता
आणि जी आली दारांतुनी
प्रसन्न वरदायिनीच मजला गमली समुपस्थिता
घ्यावया सजलों आलिंगनीं;

तोंच मजवरी रोखून लोचन लाल-लाल इंगळ
परतली ती मज धिक्कारुनी.
एकटाच मी उरलों दाटुनि करीं पदीं मरगळ.
भासलें तोंच ठाकुनी कुणी –

पकडुनि माझे केस, गदगदां हालवुनी मज, म्हणे –
" कसा रे, होसी उच्छृंखळ ?
कसा विसरशी शील संस्कृती ? काय तरी वागणें ?
मवाली ! बेवकूफ ! पागल ! "

तोंच कुणाची चाहुल आली. म्हटलें ' सुटलों चला ! '
जाहलों आणि नीटनेटका
परंतु नव्हतें कुणींच आलें ! –तोंच माझियांतला
मजकडे बघे कुणी टकमका.

" अरे शृगाला ! लपशिल कोठें मला चुकवुनी कसा ?
जगाला साळसूद तूं जरी
मीच पुरेपुर तुला जाणतों, दावुनिया भरवसा
किती त्वां गुंतविली पंजरीं ! "

त्या नजरेंतिल ह्या भावार्थें झालों घायाळ मी
काय हा विपर्यास, ना कळे !
तोंच तेथल्या अथांग भरल्या एकान्ताच्या तमीं
कांहिंसें सळसळुनी दरवळे

बावरुनी मी बघूं लागलों इकडे तिकडे जरा
सुगंधा दीपशिखा तों पुढें
हळूहळू वाढता वाढली मंदस्मितनिर्भरा
आणि ये चालुनि माझ्याकडे

हात मस्तकावरून माझ्या लागे फिरवावया
तसाचहि पाठीवरुनी मुदें
कांहिं बोलली; परि न मुळीं तें आलें ऐकावया
घुमे परि तेंच अन्तरामधें.

फुटती, फुलती एकामागुन एक बुडबुडे जळीं
भुतावळ एकान्तीं ही तशी !
अन्तर्यामीं परि घुमणाऱ्या स्वरामुळें ह्या मुळीं –
न वाटे भीति अतां ती कशी.

२७-९-६१

५२

# वेली चढाव्या मंडपीं

आलास तूं, गेलास तूं संकल्प कांहीं बोलुनी
ऐकून तें धालों मनीं केली किती वाखाणणी
संकल्प सांगावें मला हें वाटलें तुज बांधवा
मी मानितों येणें तुवां केलेस माझ्या गौरवा
आकाश-यानें टेकिती येऊन खालीं भूवरी
घ्यायास उड्डाणें नवीं ताज्या दमानें अंबरीं
जावोत सिद्धीला तुझे संकल्प ते सारे सुखें
गाईन सिद्धीचीं तुझ्या प्रेमें प्रमोदें कौतुकें

आलास तूं गेलास तूं कांहीं मनोरथ सांगुनी
अश्वांस माझ्या चित्तिच्या चंदी मिळाली त्यांतुनी
होतेच जे ठाणावरी घोटाळुनी बद्धापरी
ते लागले कीं फुर्फुरूं तूं येउनी गेल्यावरी
प्रेयें, नवीं श्रेयें, तुला तीं प्राप्त होतिल नेहमीं
माझ्या प्रयत्नांच्या पथीं नाहीं मला त्यांची हमी
लाभोत वा लाभोत ना, पर्वाहि ती मातें नसे
हे अश्व धांवूं लागले हें काय गा थोडें असे ?

वेली चढाव्या मंडपीं, सरिदौघ राहो वाहता,
तें काय मानावें जिणें जेथें गती मति कुंठिता ?

२८-९-६१

५३

# अवतार-कथांचें कोणा कौतुक ?

कितितरी ऋणांचे गिरी माझिया शिरीं
' गिरिधारी ' म्हणुनी होते स्तुति तुझी वृथा श्रीहरी.
अपमान गिळुनि मी झालों काळा-निळा
नुसताच गळा शंभूचा त्या पिउनी हालाहला

सागरीं शेष सावरी धरा निज शिरीं
जड वस्तुहि हलकी होई परि जळांत ती कितितरी
संसार जगीं सावरुनि दाखवी जरा
पुरुषार्थ तरि तुझा कांहीं मग मानूं धरणीधरा

मउमऊ पसरितों आम्ही शय्या जरी
किति विवंचनांचीं टोकें अत्युग्र तिच्यामधिं परि
तळमळत काढतों त्यांतचि तरि शर्वरी
मग नवल काय भीष्माचें जरि निजला शरपंजरीं

एकदां कुठें लागला बाण पदतळा
म्हणतात मुकुंदा, तेणें अवतार तुझा संपला
सर्वत्र आमुच्या पथीं उभीं रोविलीं
तुडवीत फळें भाल्यांचीं पदयात्रा ही चालली
चरणांची चाळण होते रक्ताळल्या
यमही न येइ वाराया ज्या कळा जिवा लागल्या

हो व्याल परिस्थितिपुढें अळींतुन उभा
त्याहुनी अकल्पित कां ह्या नच मुत्सद्यांच्या जिभा
वडवाग्नि अणूंतचि सांप्रत सामावला
विषदिग्ध हवेनें सारा अंतराळ नित कोंदला

ह्यापरी सर्वथा ग्रस्त मानवी जिणें
अवतार-कथांचें कोणा तरि कौतुक अद्भुत गुणें ?

२१-१०-६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ...32282..... विः काव्य
क्रमांक ....१५६५....... नोंः दिः

५४

## हा पतंग

हा पतंग, कीं पांखरू,
म्हणे मज "आभाळीं चल फिरूं"

किति वेड्या किति वाकड्या
मारितो सारख्या उड्या
कुरणांत जसें वासरू
शिवारीं अवखळ कीं शिंगरू

थरथरे दीपिकेपरी
गिरगिरे नर्तिकेपरी
कीं वारुवरुन् वायुच्या
बघे हा स्वार शिलंगण करूं

कितितरी चलाखी दिसे
तैशीच चढाई असे
जणुं दाखवितो कीं "पहा
किती मी पराक्रमी, वाघरू!"

सरसरा चढे वरिवरी
एकेक काय पायरी.
सूर्यास पाहतें धरूं
काय हें अंजनिचें लेंकरू

हा डोल नाच देखुनी
वाटतें, पिसें दाटुनी–
भजनांत रंगला कुणी
मुनी हा, नारद, वा तुंबरू

ऑक्टोबर, १९६१

५५

## म्हण 'तथास्तु' देवतें !

तुवां आणिलें श्रीफल, पसरिली मीं ओंजळ
परि उचंबळे कांहीं अंतर्यामीं खळबळ

आहे अंगणांत माझ्या वेल डुलत फुलत
लाभे तिला खत-पाणी तुझ्या कृपेचें अमृत

वेली-तळीं विसावून कळ्या-फुलें कुर्वाळितां
सहसा न जाणवली भूक-तहानेची व्यथा

ह्याच वेलीच्या फुलांनीं आलों उंबरे पूजत
हेंच आलों आचरत एक जीवें-भावें व्रत

त्याच फुलांचा निर्माल्य पुन्हा मलाच शृंगार
हिरा, माणिक, कांचन गणलीं त्यापुढें गार

कांचनास कुठें गोडी ? कुठें मृदुता माणकां ?
नाहीं सुगंध हिऱ्यांना, तरी तयां भुलावें कां ?

गोडी कधीं विटेनाच, मार्दवांत नाहीं उणें
सदा दुणावें सुगंध, नटे निर्माल्य ह्या गुणें

आणि ह्याच निर्माल्याचा किती अद्भुत शृंगार
तेणें निवतो अंगींचा धगधगता अंगार

ऐशी दिव्य फुलवेल माझ्या असता अंगणीं
ठाकलीस आणखी हें हातीं श्रीफल घेवोनी

हवे दारींच्या वेलीला नवें संजीवन जळ
म्हणुनिया आणियलें काय तुवां हें श्रीफळ ?

लटकतील कीं येणें नवे वेलीला लोंगर
उणा होता न मूळचा अणुरेणूही बहर

ह्याच श्रद्धेनें देवते, पसरितों ही ओंजळ
म्हण ' तथास्तु '; तरीच निवेल ही खळबळ

१०-१०-६०

५६

## ही कविता

ही कविता ? ही सरिता –
मी जिच्यांत भिजुन चिंब
भिजलेलें आणि पुन्हा बघतों माझेंच बिंब
मी जिच्यांत ती सरिता ही कविता –

ही कविता ? ही सरिता –
स्रवलेली माझ्यांतुन
शीर्षांतुन, हृदयांतुन, चरणाच्या अंघ्रींतुन
भागीरथि अवतरते भूवर की स्वर्गांतुन
मी जिच्यांत अर्पुनिया माझेंपण अर्घ्यदान
होतों समृद्ध तेंवि इतरांसह मी पावन.

ही कविता ? छे;
टांगुन ठेवियला हा दर्पण
येते जन, जाते जन, यांत बघा डोकावुन
समजतां स्वतास जें तें तर बहिरंग-रूप !
त्याहुन आहांत किती आगळेच खूपखूप
घडविल तें दर्शन हा. —
—पाहुनिया यांत मीहि
जो अनोळखी मलाच, जाणतसे कांहिकांहि.

ही कविता ? हें झुंबर
शतकोटी ज्योतींनीं
ह्या छतास अवकाशीं लावियलें पेटवुनी.
ज्योतींतुन मीच जळे, ज्योतीवर मीच जळे
मीच तेल, मी पतंग; ऐसें हें मैत्र जुळें.

ही कविता ? ही ललिता
मी जीच्या संगतींत
एकान्तीं लोकान्तीं होतों रममाण सतत.
इतर जरी रत झाले ही न तरी व्यभिचारी
आणि माझिया मनास रतिभर ना खंत तरी.
जात-कुळी काय हिची ?
माझियाच बरगडीस
उपसुनि मी निर्मियलें चिरकुलीन ह्या सतीस.

ही कविता ?
सुंदर हें स्फटिकाचें की मंदिर
नांदतसे ज्यांत घेत सौख्यभोग मदिर मधुर
शब्दांच्या शिंपल्यांत स्वप्नांचे की मौक्तिक
आहें मी जोजवीत जखमांना गोंजारित.

सुचतिल ज्या, रुचतिल ज्या कल्पना करा खुशाल
एक एक कविता परि आहे हा क्रूस शूळ
रोवुनिया ठेवियला मी स्वताच जागजागीं
लटकविलें ज्यावरती आणि मीच मजलागीं –

किंवा मी आपुल्याच चरणांनीं रिघुन जींत
बंद घेतली करून ताटी आंतून नीट
मरण ह्यापरी जिवंत जगतों मी काय न हें ?
कवितांतुन मी माझ्या काय समाधिस्थ नव्हे —
काय समाधिस्थ नव्हे ?

१९५९

५७

## सुहृदांनो !

माझिया मनांत येतें जें दाटून
येईना बोलून दाखवाया

माहितीचे शब्द हाताला लागती
पोचट वाटती परंतु ते

तयांत भावना पुरी सामावेना
होते कुचंबणा आशयाची

एक एक हिरा फोडून पाहतां
" राम " हनुमंता गवसेना

तैसाच हा माझा शब्दांचा खजीन
येई फोलपणा प्रत्ययास

होतसे खोड्यांत सांपडल्यागत
शब्द परिचित स्वीकारून

कधीं कधीं शब्द वांटती सांपळे
केविं त्यांत खेळे उच्छृंखळ ?

शब्द हे इवलीं बोळकीं, तयांत —
काय ऐरावत कोंबतां ये ?

तरी कां शब्दांची आलटापालट
करूं खटपट निरर्थक

वाटावें तुम्हांला केली बोळवण
शब्द जुळवून चारदोन

त्याहून अगाध आणि असर्याद
मौनेंचि कां साद घालूं नये ?

उघडें कराया येईना हृदय
तरी करा गय, सुहृदांनो !

२१-१०-६०

विश्रान्ति

# तो महाराष्ट्र हा प्यारा

## [ महाराष्ट्र गीत ]

मज महाराष्ट्र हा प्राणाहुनिही प्यारा
त्याचिया यशाचा झडो अखंड नगारा
हो, महाराष्ट्र हा प्यारा

पंढरी, अळंदी, देहु – भक्तिच्या मळया
नारळी-पोफळी-काजूंच्या वन राया
'साऱ्याच जिजाऊ आपण आया-बाया'
ही सतार रमणी-हृदयीं करि झंकारा
तो महाराष्ट्र हा प्यारा

भरघोस पिकें हीं कापुस, शाळू, साळी
राउळीं शिवारीं घुमती सांज-सकाळीं
लावणी, पवाडा, अभंग, गोड भुपाळी
पुरुषार्थी चारहि लाभे ज्यांत निवारा
तो महाराष्ट्र हा प्यारा

हा सह्याद्री तर कणाच कणखर ताठ
वाहती ज्यांतुनी वीररसाचे पाट
वारणा-कोयना-कृष्णा-गोदा-कांठ
परजल्या दुधारी जणुं खड्गाच्या धारा
तो महाराष्ट्र हा प्यारा

नांदेड दख्खनी पावनतीर्थ शिखांसी
काश्मीर-वनश्री हो गोमांतकवासी
त्या रामागिरीहुनि निघती मेघ प्रवासी
स्वप्नेंहि चिंतिलीं घेति जिथें आकारा
तो महाराष्ट्र हा प्यारा

भारता मिळावा अग्रपुजेचा मान
हें बांधुनि गांठीं एकच एक इमान
करुं निर्वाणीला तन-मन-धन कुर्बान
ही स्फूर्ति निरंतर देइ जेथला वारा
तो महाराष्ट्र हा प्यारा

मार्च १९६२

ी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
म .................... वि: ..................
. .................... नों: दि: ..................

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32281 वि: ....
क्रमांक 1545 नों दि: 15/4/52

## टीपा

मार्च १९५६ मध्यें 'वाकळ' कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतरच्या स्फुट कवितांपैकीं कांहीं निवडक कविता ह्या 'कमण्डलू' मध्यें समाविष्ट करण्यांत आल्या आहेत. तथापि, 'परिस्थितीपुढें' ह्या १९५६ पूर्वींच्या एका कवितेलाहि ह्या 'कमण्डलू'त अवकाश सांपडला आहे.

"हा कमण्डलु" व "फुलतों आम्ही" ह्या सुरवातीच्या दोन कविता आणि "म्हण तथास्तु देवते" "ही कविता," "सुहृदांनो" व "तो महाराष्ट्र हा प्यारा" ह्या शेवटच्या चार कविता, आशय विचारांत घेऊन, औचित्याच्या दृष्टीनें विशिष्ट स्थानीं योजिल्या आहेत. बाकीच्या सर्व कविता कालानुक्रमानें छापल्या आहेत. तरी पण, "सयांनो लावूं पणत्या" ह्या कवितेनें आपला क्रम सोडला आहे, असें दिसेल.

### हा कमण्डलु ( प्रास्ताविक )

### "डोंगरी राहतो दास"

"दास डोंगरीं राहतो । यात्रा देवाची पाहतो." असें रामदास स्वामीनींच स्वताबद्दल लिहून ठेवलें आहे.

### कुबडी तीर्थ

चाफळच्या पश्चिमेस डोंगरकपारीं रामघळीच्या जवळच हें कुबडी तीर्थ आहे.

### ३. ताम्हनाचे निनाद

### तोच जन्मला

लो. टिळकांच्या जन्मशताब्दीच्या निमित्तानें झालेली कविता. जन्मदिन २३-७-१८५६. "स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम्" ह्या

सुभाषिताचा ध्वनि 'तोच जन्मला' यांत जाणवतो, असें म्हटल्यास हरकत नाहीं.

## ९. त्या दिवसापासुनी

१७ जून १८५८ हा तो दिवस. ह्या दिवशीं झांशीची राणी लक्ष्मीबाई हिनें पाठलाग करणाऱ्या शत्रूच्या सैनिकांशीं सामना दिला व त्यांना परतवलें. पण त्यांत तिला जखमा झाल्या व तिचा अंत झाला.

## १७. नाटक झालें जन्माचें

पौराणिक व ऐतिहासिक व्यक्तींचें उल्लेख ध्यानीं यायला अडचण पडणार नाहीं. पण सांगायला पाहिजे तें 'जयंत' बद्दल. हा 'जयंत' राम गणेश गडकरी यांच्या 'प्रेमसंन्यास' नाटकांतील आहे.

## २९. मंत्राक्षता

स्वतंत्र महाराष्ट्र-राज्य-निर्मितीच्या शुभ घटिकेला उधळलेल्या ह्या मंत्राक्षता होत. "उंच चढा, उंच चढा" आणि "नवा महाराष्ट्र" ह्या कवितांहि त्याच घटनेंतून संभवल्या आहेत.

## ३८. मेल्यानें होत आहे रे

चार-चक्षुः—हेर हेच ज्यांचे डोळे ते ( म्हणजे राजे, राज्यकर्ते. )

जगून तुजला......मरून:—ज्यानें आत्महत्त्या केली त्याच्या कुटुंबियांच्या योगक्षेमासाठीं वरिष्ठांच्या नेतृत्वाखालीं एक निधि जमवण्यांत आला आणि त्यांतून मुलांच्या शिक्षणाचीही चांगली सोय करण्यांत आली.

## ३९. उभारा

ब्रह्मशीर : पृथ्वी जाळणारें अस्त्र.

ऐषिख : गर्भावस्थेंतील जीवांना नष्ट करणारें अस्त्र.

## ४०. या हो योगेश्वरा

नारायण : अस्त्रविशेष.

कौरव-पांडव-कालीन भारतीय महायुद्धांत अश्वत्थाम्यानें ह्या तिन्ही अस्त्रांचा वापर केला होता.

## ४१. अर्जुनि वाटतें

व्हटाळी ( ओठाळी ) :— घोड्यांच्या खालच्या ओठास बांधावयाची काढणी. तिचा लगामासारखा चालचलाऊ उपयोग करतात.

## ५५. म्हण 'तथास्तु' देवते

" तुलां आणिलें श्रीफल " ह्या उद्गारांत, महाराष्ट्र-शासनानें मानधन व 'महाराष्ट्र कवि' हें बिरुद देऊन कवीच्या काव्यसेवेचा गौरव केला, ही थोर घटना अभिप्रेत आहे.

## ५६. ही कविता

" माझियाच बरगडीस···सतीस "—आदि मानव आदम ह्यानें आपल्या बरगडीमधून 'ईव्ह' ही स्त्री निर्माण केली. त्या कथेवर ही कल्पना अधिष्ठित आहे.

## तो महाराष्ट्र हा प्यारा

" त्या रामगिरीहुनि॰—कालिदासाच्या मेघदूताचा संदर्भ ह्या चरणांतून रुणझुणत आहे.

"स्वप्नींहि चिंतिलीं॰"—पुढें होणाऱ्या गोष्टी रामदासांना स्वप्नांत दिसल्या होत्या. त्या तसतशा प्रत्यक्षांत घडलेल्या पाहून " स्वप्नीं जें देखिलें रात्रीं। तें तें तैसेंचि होतसे " असे आनंदोत्कट उद्गार त्यांनीं काढले होते. त्यांचा पुनःप्रत्यय आजहि येत आहे.

## शुद्धाशुद्ध

छापतांना कांहीं ठिकाणच्या काना-मात्रा क्वचित् उडालेल्या किंवा सरकलेल्या आहेत. त्यांबाबत वाचक सांभाळून घेतील. पण अक्षरांच्या चुका खालीलप्रमाणें दुरुस्त करून घेणें:–

पृ. ७९ " दुसरी माझी पण " ह्या चरणांत ' पण ' ऐवजीं ' पणती ' पाहिजे.

पृ. ८२ ओळ ९ : " भूत काळ " ऐवजीं " भूत मांळ " पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. १२६७६
REFBK-0012716
REFBK-0012716

# यशवन्त यांची साहित्य संपदा

## कविता - संग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| यशोधन | ३·५० | यशोगिरी | १·५० |
| भावमंथन | ०·५० | ओजस्विनी | २·०० |
| यशोगंध | ३·०० | वाकळ | ३·०० |
| यशोनिधि | १·५० | कमण्डलु | ३·५० |

*शिवाय*

**मित्रप्रेमरहस्य** : ( विलापिका ) ★ **तुटलेला तारा** : ( विलापिका )

**यशवन्ती** : ( कविता-संग्रह )

**पाणपोई** :
किंमत तीन रुपये

निवडलेल्या कवितांचा संग्रह. श्री. वि. स. खांडेकर यांची विवेचक सविस्तर प्रस्तावना.

**बंदीशाळा** :
किंमत तीन रुपये

बाळगुन्हेगारांच्या त्रिविध अवस्थांचे करुणरम्य खंडकाव्य.

**जयमंगला** :
किंमत दोन रुपये

एकमुखी भावगीतांच्या गुंफणींतून अनुस्यूत झालेली प्रेमकथा.

**काव्यकिरीट** :
किंमत दीड रुपया

राजधर्म सांगणारें राज्यारोहणविषयक दीर्घ काव्य.

**पर्वकाल ये नवा**
किंमत दोन रुपये

प्रतापगड, जीवितनौका, देव्हाऱ्यांतील नाणें, सुसर आणि माकडाचा पोर व पर्वकाल ये नवा या पांच संगीतिकांचा संग्रह.

**मुठे ! लोकमाते !**
किंमत एक रुपया

पानशेत आणि खडकवासला हीं धरणें फुटल्यानें जुलै १९६१ मध्यें कोसळलेल्या आपत्तीचें आणि पुनरुत्थानाच्या संदेशाचें काव्य.

## गद्य - वाङ्मय

**प्रापंचिक पत्रें :** संसाराच्या वास्तवतेंतील रम्योत्कटतेचें भावचित्रण
किंमत ३ रुपये

**कांतणीचें घर :** लघुनिबंध
किंमत २ रुपये

**घायाळ :** स्टीफन झ्वाइगच्या प्रदीर्घ कथेचा अनुवाद
किंमत २ रुपये

**वनवास :** रिचर कॉनरॉड याच्या संक्षिप्त कादंबरीचा अनुवाद
किंमत २ रुपये

**हापिसर :** "थोरमहात्मे होऊन गेले चरित्र त्यांचें पहा जरा" हें तर खरेंच, पण सामान्य प्रापंचिकाचेंहि चारित्र्य तुल्यगुणी आणि तेजस्वी असूं शकतें. अशा आदर्श पुरुषाची लखलखीत व्यक्तिरेखा.
किंमत ३·५० रुपये

## बालवाङ्मय - पद्य

**मोतीबाग** ( बालगाण्यांचा संग्रह )

## बालवाङ्मय - गद्य गोष्टी

**दरोडेखोर ? छे देवदूत**
**चाणाक्ष न्यायाधीश**
**भगवी गीता**
**अमलांगी**
**रंजना**
**अनंग-वासंती**

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

## आमचे प्रसिद्ध काव्य-संग्रह

| | |
|---|---|
| फुलांची ओंजळ | कवि ‘ बी ’ |
| स्वप्नलहरी | माधव ज्यूलियन |
| हरपलें श्रेय | केशवसुत |
| स्वगत | कुसुमाग्रज |
| आनंद भैरवी | बोरकर |
| मेंदी | इंदिरा सन्त |